बुधवार, २० सप्टेंबर २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ५०
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 20 SEPT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-50 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# आले रे आले बाप्पा आले



लोकमान्य टिळकांनी सुरु केलेला सार्वजनिक गणेशोत्सव आता हर्षोल्ल्हासात सर्वत्र साजरा होत आहे. चंद्रपूर येथे एका मंडळाच्या गणपतीची स्थापना करण्यासाठी नेतानाचे छायाचित्र टिपले आहे आधुनिक केसरीचे जिल्हा प्रतिनिधी शाम हेडाऊ यांनी.

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यात मंगळवारी गणरायाचे जल्लोषात आगमन झाले. घराघरांत प्रचंड उत्साहात बाप्पाची प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वर्षा या शासकीय निवासस्थानी बाप्पाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या बंगल्यावर गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.**

कोकणामध्ये गणेश चतुर्थीचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. सिंधुदुर्गात 71,798 घरी बाप्पांचे आगमन झाले असून मोठ्या भक्तिभावाने बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

रत्नागिरीतल्या पावस, पूर्णगड भागात होडीतून बाप्पाचे आगमन झाले. कोकणात गणेशोत्सवाचा सण अगदी पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो. त्यामुळे फुगड्या घालून, टीपरी नृत्य करतच बाप्पाचे स्वागत केले जाते. रत्नागिरी जिल्ह्यातल्या संगमेश्वर तालुक्यातील तूरळ गावच्या महिलांनी टिपरी नृत्य ही लोककला आजही जपली आहे. आता कोकणात पुढचे दहा दिवस हा असाच उत्साह पहायला मिळणार आहे.

पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापुरातही लाडक्या गणपती बाप्पाचे स्वागत अगदी धुमधडाक्यात करण्यात आले. कोल्हापुरातील कुंभार गल्ली, बापट कॅम्प, गंगावेश इथे घरगुती गणपती नेण्यासाठी गणेश भक्तांनी गर्दी केली. घरातील लहान मुलांपासून वयोवृद्ध नागरिकांपर्यंत सर्वांनीच बाप्पाचे स्वागत केले.

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या सागर या निवासस्थानी विधीवत गणपतीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी देवेंद्र फडणवीसांच्या आई, पत्नी अमृता आणि मुलगी दिविजासह इतर कुटुंबीय उपस्थित होते. आपल्या राज्यासमोर आणि देशासमोर जी विघ्न आहेत ती गणेशाचे वंदन केले की दूर होतात, अशा भावना यावेळी फडणवीसांनी बोलून दाखवल्या. तर अमृता फडणवीसांनी राज्यात समृद्धी नांदू दे, असे साकडे घालत बाप्पासाठी खास गाणेही म्हटले. मोदी सरकारच्या महिला आरक्षण बिलला सर्वपक्षीय समर्थन मिळेल आणि या अधिवेशनात हे बिल पास होईल, अशी अपेक्षा फडणवीसांनी बोलून दाखवली.

## सगळी विघ्ने दूर होऊ दे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

गणेश चतुर्थीच्या निमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच विघ्नहर्ता राज्यात पाऊस पाडेल आणि आनंदाची बरसात करेल अशी मला अपेक्षा आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रातील नागरिकांची स्वप्ने साकार करण्यासाठी मी गणरायाला साकडे घातले आहे, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

गोरगरीब जनता, पोलिसांसाठी घरे, गिरणी कामगारांच्या घरांसाठी लॉटरी असे अनेक चांगले निर्णय आम्ही लोकांसाठी घेतले आहेत, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटले आहे. ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यापैकी एकाही शेतकऱ्याला आम्ही सरकार म्हणून वाऱ्यावर सोडणार नाही. शेतकऱ्यांना आम्ही नियम मोडून मदत केली आहे. १ रुपयात शेतकऱ्याला पिकवीमा मिळतो आहे. आम्ही बळीराजाच्या पाठिशी ठामपणे हे सरकार उभे आहे, असेही यावेळी त्यांनी सांगितले.



आज गणपतीचे आगमन झाले आहे. मी सगळ्यांना मनापासून आजच्या दिवसाच्या शुभेच्छा देतो. आजचा दिवस महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा आहे. शहर असो किंवा ग्रामीण भाग सगळीकडे गणरायाचे आगमन झाले आहे. आजचा दिवस महाराष्ट्रातल्या प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यातल्या आनंदाचा दिवस आहे. महाराष्ट्राच्या जनतेवरचे, शेतकऱ्यावरचे, गोरगरीब जनतेवरचे अरिष्ट दूर होऊ दे असे साकडे मी आज देवाला घातले आहे. आमच्या प्रयत्नांना विघ्नहर्ता बळ देईल, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. मागच्यावर्षी निर्बंधमुक्त गणेश उत्सव साजरा झाला. यावर्षीही मी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. जी मंडळे वर्षानुवर्षे शिस्तीने आणि नियमाने गणपती बसवतात त्यांना सरसकट पाच वर्षांची संमती द्यावी. लोकमान्य टिळक यांनी गणेश उत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरु केले. कारण लोक एकत्र आले पाहिजेत आणि त्यांच्या मनात स्वातंत्र्याची भावना निर्माण व्हावी हा त्यामागचा उद्देश होता. आपण आजही तो उत्सव साजरा करतो, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

# नव्या संसद भवनाचा श्रीगणेशा महिला आरक्षण विधेयकाने

## महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी देवाने मला निवडले : पंतप्रधान मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** गणेश चतुर्थीच्या मुहुर्तावर नव्या संसद भवनात



कामाचा शुभारंभ झाला. पंतप्रधान मोदींनी नव्या संसदेत सर्व खासदारांना संबोधित केले. तसेच, नव्या संसद भवनातून पंतप्रधान मोदींनी महिला आरक्षण विधेयकाची घोषणा केली. कालपासून महिला आरक्षण विधेयकाला केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाल्याचे बोलले जात होते. आज याच चर्चांवर मोदींनी स्वतः शिक्कामोर्तब करत महिला आरक्षणासाठी घटनेत दुरुस्तीचे विधेयक मांडणार असल्याची मोठी घोषणा केली. महिला आरक्षण विधेयकासंदर्भात केलेली घोषणा ही नव्या संसद भवनात मोदींनी केलेली पहिली मोठी घोषणा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, अटलजींच्या कार्यकाळात अनेक वेळा महिला आरक्षण विधेयक आणले गेले. पण ते विधेयक मंजुर करण्यासाठी डेटा गोळा करता आला नाही आणि त्यामुळे अटलजींचें स्वप्न अपूर्णच राहिले. महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या शक्तीला आकार देण्याचे काम करण्यासाठी देवाने मला निवडले आहे. पीएम मोदींनी महिला आरक्षणाला 'नारी शक्ती वंदन कायदा' असे नाव दिले आहे.

लोकसभा-विधानसभेत महिलांना 33 टक्के आरक्षण

महिला आरक्षण विधेयकांतर्गत विधानसभेच्या 33 टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील. याशिवाय लोकसभेतही महिलांना 33 टक्के आरक्षण मिळणार आहे. म्हणजेच, 181 जागा महिलांसाठी राखीव असतील. तसेच, दिल्ली विधानसभेत महिलांना 33 टक्के आरक्षण मिळणार आहे.

**सध्या लोकसभेत महिला खासदारांची टक्केवारी किती?**

सध्याच्या लोकसभेत 78 महिला खासदार आहेत, जे प्रमाण एकूण 543 च्या 15 टक्क्यांपेक्षा कमी आहे. आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, गोवा, गुजरात, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, ओडिशा, सिक्कीम, तामिळनाडू, तेलंगणा, त्रिपुरा आणि पुद्दुचेरीसह अनेक राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व 10 टक्क्यांहूनही कमी आहे. दरम्यान, गेल्या काही आठवड्यात काँग्रेस, बीजू जनता दल (BJD) आणि भारत राष्ट्र समिती (BRS) सह अनेक पक्षांनी महिला आरक्षण विधेयक आणण्याची मागणी केली आहे.


## मोदी सरकारने आणलेले महिला आरक्षण विधेयकही निवडणूक 'जुमला'च : नाना पटोले

भारतीय जनता पक्षाच्या सरकारने महिला



विधेयकाला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली असून हे विधेयक आता लोकसभेत मांडले जाणार आहे. परंतु भाजपाची आतापर्यंतची पार्श्वभूमी पाहता हे महिला विधेयक हे आणखी एक निवडणुक जुमलाच ठरेल असे दिसत आहे. विधेयकातील तरतुदी पाहता महिला आरक्षण विधेयक इव्हेंट मॅनेजमेंटशिवाय दुसरे काहीही नाही. महिला आरक्षण कायदा झाला तरी त्याची अंमलबजावणी २०२४ च्या निवडणुकीसाठी होणार नसून देशातील कोट्यवधी महिलांचा मोदी सरकारने भ्रमनिरास केला आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना नाना पटोले म्हणाले की, महिला आरक्षण विधेयक संसदेच्या विशेष अधिवेशनात मंजुर झाले तरी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्याची अंमलबजावणी होण्याची शक्यता दिसत नाही. लोकसभा व विधानसभेतील ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याआधी जनगणना होणे गरजेचे आहे, २०२१ साली होणारी जनगणना मोदी सरकारने अद्याप केलेली नाही, तसेच मतदारसंघ पूनर्रचना केल्यानंतरच हा कायदा लागू केला जाऊ शकतो. मतदार पूनर्रचना २०२६ साली होणार आहे. २०२४ च्या निवडणुकीपूर्वी जनगणना आणि मतदारसंघ परिसीमन होईल का? हा खरा प्रश्न आहे, ही सर्व परिस्थिती पाहता महिला आरक्षण विधेयक संसदेच्या विशेष अधिवेशनात मंजूर झाले तरी त्याची अंमलबजावणी लगेच होईच असे दिसत नाही. महिलांना राजकारणातही संधी देण्याच्या दृष्टीने स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ महिला आरक्षण दिले. डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीएचे सरकार असताना सोनियाजी गांधी यांच्या पुढाकाराने महिला आरक्षण विधेयक राज्यसभेत मांडून ते मंजूर करण्यात आले. महिला आरक्षण विधेयकासाठी सोनियाजी गांधी ह्या सातत्याने पाठपुरावा करत आहेत. भाजपाची आरक्षण व महिलांबाबतची भूमिका पाहता या विधेयकाची अंमलबाजणी होईल असे वाटत नाही. भाजपाला आता लोकसभा निवडणुकीत पराभव दिसत असल्याने ५० टक्के लोकसंख्या असलेल्या महिलांचा पाठिंबा मिळावा यासाठी मोदी सरकारची धडपड सुरु आहे आणि केवळ निवडणुकीवर डोळा ठेवूनच हे विधेयक आणले असल्याचा टोलाही काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी लगावला.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ज्योत दिव्याची मंद तेवते....




आधुनिक केसरी

वेळ संध्याकाळची. थोडा अंधार पडायला लागला होता. घरातले दिवे लावले. पण देवाजवळही दिवा लावल्याशिवाय बरं वाटत नाही. किंबहुना आपली परंपराच आहे ती ! थोडा वेळ दिवा लावून देवाजवळच शांत बसून राहावं. त्याच्यासारखं सुख नाही. देवाजवळच्या समईच्या वातींना थोडा गुल ( कार्बन ) आला होता. तो बाजूला केला. समईत थोडं तेल घातलं आणि काडी पेटवली. वातींनी पेट घेतला. समईच्या ज्योतीकडे पाहिलं. सुरुवातीला ज्योत काही क्षण निळसर भासली. नंतर ती पिवळ्या सोनेरी रंगाची झाली. काही वेळानं समईतलं तेल संपल्यानंतर ती जेव्हा मालवली तेव्हा किंचित काळ लालसर होऊन शांत झाली.

या ज्योतीकडे पाहत असताना मानवी जीवनासंबंधी मनात विविध विचार आले. सुरुवातीला ती ज्योत निळसर दिसली. हा निळा रंग म्हणजे आपले बाल्य. ती ज्योत जशी क्षण दोन क्षण निळी दिसते तसेच आपले बाल्यही रम्य असते. अल्पकाळ टिकणारे असते. कधी संपते ते कळत नाही. म्हणून तर बालपणीचा काळ सुखाचा असे आपण म्हणतो. निळ्या रंगाचे हे पक्षी केव्हा भुर्रकन उडून जातात ते कळत नाही. पण आठवणी मात्र जन्मभरासाठी ठेवून जातात. पण ही सुरुवातीची ज्योत वादळवाऱ्यापासून खूप जपावी लागते. तिला थोडाही वाराही सहन होत नाही. म्हणून सुरुवातीला तिचे रक्षण करावे लागते. कधी ज्योतीभोवती आपण काच लावतो, तर कधी हातांचा आडोसा करतो. घरात पंखा सुरु असेल तर पंखा बंद करावा लागतो. बाल्य जपायचे असेल तर ते सांभाळणाऱ्या हातांना सुखाचा त्याग करावाच लागतो. तरच ही ज्योत तेवत राहते. एकदा का ज्योत पुरेशी प्रकाशमान झाली की थोड्याशा वाऱ्यापासून तिला फारशी भीती नसते. आणि आता तिला वाऱ्याला भिऊन चालणारही नसते. तिला प्रकाशायचे असते. बालपणीची निळसर झाक कुठल्या कुठे विरून जाते आणि तारुण्याचा सोनेरी प्रकाश उजळतो. ही ज्योत प्रकाशमान होण्यासाठी दिव्यातल्या दोन वाती एकत्र येतात. त्या जळत जातात, कणाकणाने झिजत जातात. या दोन वाती म्हणजे आपले आईवडील. मुलांचं आयुष्य उजळावं म्हणून ते कणाकणानं झिजत असतात. कष्ट, त्रास आनंदानं सहन करतात. स्नेहाचं, प्रेमाचं तेल त्यांनी त्या दिव्यात घातलेलं असतं. जोपर्यंत ते आहेत, तोपर्यंत ते हे स्नेहाचं, प्रेमाचं तेल कमी पडू देत नाहीत.

## आनंदी पहाट



# दीर्घकालीन मानसिक तणाव घातक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दररोजच्या चिंता तुमच्या विचारांमध्ये तुम्हाला अडकवतात, तर काही चिंता अनेकदा शरीरात शारीरिकरित्या प्रकट होतात. त्यामुळे तुम्हाला अशक्त किंवा हलके वाटू शकते. चिंताग्रस्त विकार वयानुसार वाईट होतातच असे नाही, परंतु चिंताग्रस्त लोकांची संख्या आयुष्यभर बदलते. वृद्धापकाळात चिंता अधिक सामान्य होते आणि मध्यमवयीन प्रौढांमध्ये सर्वात सामान्य असते. मेंदूतील रासायनिक प्रक्रियांमुळे चिंता प्रबळ तेव्हा होते, जेव्हा एखाद्या व्यक्तीला चिंता वाटते आणि त्याला लक्ष केंद्रित करण्यास किंवा स्पष्टपणे विचार करण्यास त्रास होत असतो. मानसिक आरोग्य निदान आणि शारीरिक आजारांसह अनेक परिस्थितींमुळे चिंता निर्माण होऊ शकतात. अधूनमधून चिंता अनुभवणे सामान्य आहे असे वाटत असले तरीही, विशेषतः उच्च तणावाच्या काळात त्याचा खूप मोठा आणि विपरीत परिणाम भोगावा लागत असतो. अर्थात या अशा प्रकारच्या समस्या दुर्मिळ आहेत. सामान्य मेंदूच्या रासायनिक बदलांच्या कारणांमध्ये खूप वेळा खाणे, निष्क्रियता, पुरेशी झोप न मिळणे, दीर्घकाळचा ताण आणि खराब आहार यांचा समावेश होतो.

नकारात्मक माहितीमुळे मेंदूच्या महत्त्वपूर्ण माहिती प्रक्रिया क्षेत्रामध्ये क्रियाकलाप वाढतात, आपले वर्तन आणि वृत्ती, वाईट बातम्या, अनुभव आणि माहिती यांच्याद्वारे अधिक प्रभावीपणे आकार घेतात. सकारात्मक विचार आपल्या कल्याणासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी खरोखर महत्त्वपूर्ण असतात. मानवी अनुभवातील राग आणि दुःख यासारख्या भावनांची भूमिका स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे. जर तुम्हाला चिंता किंवा फोबियासारखा प्रकार असेल तर, एकांत, मनःशांती, ध्यानाभ्यास तुम्हाला शांत वाटण्यास तसेच इतर

समस्यांना तोंड देण्यास, अधिक सक्षम होण्यास मदत करू शकतात. रात्रीच्या वेळी तुमची चिंता वाढण्याची अनेक कारणे असू शकतात.



आधुनिक केसरी

## कर्माचा संबळ | धन्य झाला ||

अंबेच्या दरबारी | वाजु दे संबळ ||
घालु या गोंधळ | भक्तीमुक्तीचा ||१||
गोंधळास या हो | देवा गजानना ||
पार्वती नंदना | विघ्न हरी ||२||
देव देवता येता | गोंधळ रंगला ||
देह गंधाळला | चंदनाचा ||३||
गोंधळी रमला | आत्माराम माझा ||
विकारांचा बोजा | लुप्त झाला ||४||
त्रिगुण तापाचा | तुटला रे बंध ||
ब्रह्मानंद कंद | हाती आला ||५||
होऊनी निस्संग | घालता गोंधळ ||
कर्माचा संबळ | धन्य झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

देहि मे शरणं दुर्गे जगतः पालिके शिवे | धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् || ९१ || हे दुर्गे, शिवे, जगताचे पालन करणारे, मला शरण दे. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

कर्म पाश पाशे नहीं, नाहिं गरभ में आय ।
दुख सुख वह व्यापे नहीं, कौन पुरुष अस आय
।।२०।।(स्वर्वेद प्रथम मण्डल नवम अध्याय)

०१/०९/२० मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : तो जन्म-मरण रहित नित्य अविनाशी सत्पुरुष कर्मबंधनात फसत नाही किंवा स्त्री गर्भातही प्रवेश करत नाही. भौतिक सुख-दुःखाचे त्यांना भान असत नाही. सर्वांपासून असंग, निर्लेप होऊन जगजीवांना ते ब्रह्मविद्येचा सदुपदेश देऊन परमानंद प्रदान करतात. ते गर्भात येऊन संसारात प्रगट होत नसून आपल्या शुद्ध संकल्पानेच प्रगट होऊन जगजीवांना दर्शन देतात. प्रकृतीच्या विषय माया संबंधाने रहित असल्याने जगातील सुख-दुःखाचा त्यांना आभास होत नाही . असा नित्य अविनाशी सत्पुरुष कोण आहे, जो जगात व्यक्त रूपात प्रगट होऊन जगत कल्याण करतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## स्वामी विवेकानंद

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार १३० वर्षांनंतर ही किती महत्त्वाचे आहेत हे लक्षात येते. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत आपल्या भाषणाची सुरुवात, बंधू आणि भगिनींनो अशी केली.विश्वधर्माची कल्पना मांडून ते थांबले नाहीत तर, वसुधैव कुटूंबकम् हा संदेश उपस्थित समुदाया समोर मांडून विश्वधर्माची संकल्पना किती उदात्त आहे हे पटवून दिले. आजची युवा पिढी तर महिती व तंत्रज्ञान क्षेत्रामुळे सर्वच क्षेत्रात पारंगत आहे.त्यांच्या कार्याच्या क्षमता वाढत अजूनही उंच उंच भरारी घेऊन भारतमातेचे नाव उज्वल करतील यात शंका नाही. शिकागो येथील सर्वधर्म परिषदेच्या ऐतिहासिक भाषणाला १३० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल विश्वबंधुत्वाची ओळख नव्या पिढीला होऊन, देशभक्ती आणि देशाप्रति प्रेम ,आदर आपण सर्वांनी अंगीकरले तर ती खरी राष्ट्रभक्ती ठरेल. त्यासाठी गरज आहे खेड्यापाड्यात व शहरात युवकांनी पुढाकार घेतला तर आपला व समाजाचा उद्धार झाल्याशिवाय रहाणार नाही. पण त्यासाठी गरज आहे सामाजिक बांधिलकीची.यासाठी युवकांनी थोर महात्म्याची चरित्रे वाचली पाहिजेत आपल्या आचरणात आणली पाहिजेत.

# संत 'तू भगवंताचा आहेस' ही जाणीव देतात

आधुनिक केसरी

आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यासमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत 'तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस' असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे 'मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे' असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुनः पुनः मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे. तुम्हाला रामदर्शन पाहिजे म्हणता, पण राम तुम्हाला ओळखता कसा येणार ? रामदर्शन व्हायला रामाचे अंतर काटता आले पाहिजे; रामाला पक्के ओळखता आले पाहिजे. याकरिता अंतःकरणाची पवित्रता पहिजे; शुद्ध भाव पाहिजे. सर्व काही साधने केली, पण भाव नसेल तर ती व्यर्थ होतात. कालांतराने त्यामुळे भाव उत्पन्न होईल हे खरे, पण भाव ठेवून साधने केली म्हणजे प्राप्ती लवकर होते. नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे ही होय. आपण सर्वस्वी देवाचे होऊन राहावे म्हणजे आपण जे काही करतो ते सर्व अर्पणच होते. ज्याने त्याने आपले हित ओळखून वागणे हे जरूर आहे. कल्याणाचा मार्ग कुणीही दाखवील, पण त्याप्रमाणे वागणे हे ज्याचे त्याच्याकडे



आहे. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण ही आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नाम तेवढे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधान राहणे ही देवाची पूर्ण कृपा होय. अग्नीचा उपयोग तो करून घेणाऱ्यावर आहे; तसा देवाचा उपयोग जसा करावा तसा होतो. परमेश्वराच्या ध्यानाने सिद्धी येतात आणि सिद्धी तर त्याज्य; मग परमेश्वराचे ध्यान करूच नये की काय ? तर ध्यान हे सिद्धी मिळविण्यासाठी करू नये. परमेश्वर-प्राप्तीकरिता निष्कामबुद्धीने ध्यान करावे, म्हणजे परमेश्वर सिद्धीचे अडथळे दूर करतो. साधू सिद्धींचा उपयोग कधीही करीत नाहीत; ते परमात्मस्वरूपात मिळून गेलेले असतात. सर्व गोष्टी ते परमात्म्यावर सोपवितात आणि त्याच्या इच्छेनेच केव्हा केव्हा चमत्कार झाल्याचे साधूंच्या चरित्रात दिसते.

## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

समजा इतीहासाचे शिक्षक गणीत शिकवु लागले तर मनाची तयारी होत नसते म्हणुन काय इतीहासाच्या शिक्षकाला गणीत येत नाही असे थोडेच आहे त्यांना सर्व येते आपण मानले नाही तर त्यांना थोडाच फरक पडणार आहे . तेव्हा प्रत्येक गुरुंचा आदर करणे,ते जे ज्ञान देतात ते आमलात आणणे हेच आपले कर्तव्य असते हिच गुरु सेवा असते . आपले गुरु आपला हा भाव सुद्धा पहात असतात..म्हणुन गुरु म्हणजे सर्वस्व. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एकच झाले पाहिजे. म्हणजे दैववशात जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे आपल्या गुरूशी बोलावे, आपले सर्व दुःख फक्त गुरुंना सांगत जावे. परमात्म्याकडे जाण्याचे अनेक मार्ग आहेत. आपल्या गुरूंनी जो राजमार्ग दाखविला त्यानेच जावे.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

बहु बरा बहु बरा ।यासांगातें मळि चारा ॥१ ॥
म्हणोनि जीवेंसाठीं ।घेतली कान्होबाची पाठी ॥ध्रु. ॥
बरवा बरवा दिसे ।समागम याचा निमिषें ॥२ ॥
पुढती पुढती तुका ।सोंकला सोंकवितो लोकां ॥३ ॥
घेती पाण्यासी हुंबरी ।त्यांचें समाधान करी ॥१ ॥
ऐशी गोपाळांची सवे ।जाती तिकडे मागें धांवे ॥ध्रु. ॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २० सप्टेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात श्रींची स्थापना

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. समाजातील सर्वस्तरातील मान्यवर लोकांना या माध्यमातून एकत्र आणून समाजोपयोगी विविध उपक्रम या माध्यमातून राबविण्याची सूचना वसंत मुंडे यांनी केली आहे. त्यामुळे रक्तदान शिबीर, गरजूंना अन्नधान्य व उबदार कपड्यांचे वाटप यंदाच्या श्री गणेश उत्सवात करण्यात येणार आहे. राज्य पत्रकार संघाच्या गारखेडा परिसरातील विभागीय कार्यालयात मंगळवारी प्रचंड उत्साहात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, मराठवाडा साथीचे जाहीरात व्यवस्थापक प्रमोद ठोसर, विरतण व्यवस्थापक अनिल चाफेकानडी आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.

## खासदार नवनीत राणांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** आमदार यशोमती ठाकूर यांना गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी 'कडक नोटा' दिल्या होत्या, असा आरोप खासदार नवनीत राणा यांनी काही दिवसांपूर्वी केला होता. त्याचे पडसाद अजूनही उमटतच आहेत. त्यांच्या वक्तव्याची चौकशी करून खासदारकी रद्द करण्यात यावी या मागणीसाठी काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हा अध्यक्ष प्रवीण मनोहर यांच्या नेतृत्वात मंगळवारी निवडणूक आयुक्तांकडे तक्रार दाखल करण्यात आली. खा. नवनीत राणा यांनी दहीहंडीच्या कार्यक्रमात बोलत असताना २०१९ च्या निवडणुकीत आमदार यशोमती ठाकूर यांना 'कडक नोटा' दिल्याचे वक्तव्य केले होते. यावरून राजकीय वातावरण चांगलेच तापलेले आहे. प्रवीण मनोहर म्हणाले, राणा यांच्या आरोपानंतर आ. यशोमती ठाकूर यांना प्रत्युत्तरही दिले, पण जिल्ह्यात राणा दाम्पत्याच्या या कृतीमुळे संताप व्यक्त होत आहे. खासदार राणा यांच्या या आरोपामुळे काही प्रश्न निर्माण होत आहे की, नवनीत राणा यांनी आरोप केलेल्या 'कडक नोटा' किती होत्या? राणा यांनी त्या आमदार यशोमती ठाकूर यांना कशा साठी दिले?

# ढोल ताशांच्या गजरात गणरायाचे स्वागत

## गणेश चतुर्थीनिमित्त राजुरेश्वराच्या चरणाशी भाविकांची गर्दी

आधुनिक केसरी न्यूज




**प्रा. बाळासाहेब बोराडे**

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री गणेश चतुर्थी निमित्त भाविकांनी राजुरेश्वराच्या पायथ्याशी गर्दी केली होती. भक्तांनी गणेश चतुर्थी निमित्ताने राजुरेश्वराचे दर्शन घेतले. गणेशाची मूर्ती खरेदी करण्यासाठी भाविकांमध्ये उत्सुकता होती. आपल्या लाडक्या बाप्पाचे ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत स्वागत केले. यावेळी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजराने परिसर दुमदुमला होता. राजुरेश्वराच्या पायथ्याशी गणेशाच्या मूर्तीने परिसर नटला होता. विविध भागातून येऊन मूर्ती विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. घरगुती छोट्या गणपतीपासून तर मध्यम आणि मोठ्या आकाराच्या गणेश मूर्ती बाजारात उपलब्ध होत्या. गणरायाच्या विधिवत पूजेसाठी फळे, फुले, हार, श्रीफळ, कपूर, धूप, कापसाचे वस्त्र, जानवे, गुलाल अगरबत्ती, दुर्वा, आघाडा, शमीपत्र, बेल, डाळिंब, सीताफळ, मक्का, चिकू, केळी, सफरचंद आदी साहित्य भक्तांकडून खरेदी करण्यात आले. गणेशोत्सवाच्या काळातच गौरी सणांचेही आगमन होणार आहे. बाजारात मांडलेल्या महालक्ष्मीच्या आकर्षक मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. महिलांनी महालक्ष्मीचे मुखवटे, पूर्णाकृती मूर्ती, मखर व पूजेसाठी लागणारे साहित्य खरेदी केले. आपला गणपती इतरांपेक्षा वेगळा दिसावा म्हणून गणेश मंडळामध्ये चढाओढ लागते.त्यासाठी गणेश भक्तांनी मोठ्या प्रमाणात सजावट साहित्य खरेदी केले. यामध्ये लायटिंग, थर्माकोल, प्लास्टिक फुलमाळ, मखर, चौरंग, रंगीत पताका, बेगड,चमकी, कार्डशीट,रांगोळी यासारख्या सजावट वस्तुंची गणेशभक्तांनी खरेदी केली. गणेश चतुर्थी निमित्त राजुरेश्वर परिसरास बाजारपेठेचे स्वरूप प्राप्त झाले होते. शोभेच्या वस्तू, फुगे, रिमोटकार, बासरी, बाहुल्या यासारख्या लहान मुलांच्या खेळणीने दुकाने सजली होती. डेकोरेशन साहित्यही मोठ्या प्रमाणत उपलब्ध होते. गणेशमूर्तींच्या खरेदीसाठी भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने रस्त्याच्या कडेला दुतर्फा वाहनांची संख्या वाढली होती. वाहतूक व्यवस्था सुरळीत लावण्यासाठी जागोजागी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. घरगुती तसेच मंडळाकडून गणेशाचीमूर्ती खरेदीसाठी भाविकांमध्ये उत्सुकता होती.बाजारपेठत चैतन्य निर्माण झाले होते. गणेश भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत स्वागत केले. यावेळी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजराने परिसर दुमदुमला होता.

# डॉ. रूपाली शिंदे यांना पीएच. डी. प्रदान

आधुनिक केसरी न्यूज



**लोणंद :** फलटण तालुक्यातील तरडगाव शिंदेमाळच्या डॉ. रुपाली किरण शिंदे यांना दक्षिण कोरिया मधील चुंगबुक नॅशनल युनिव्हर्सिटीमधून कॉम्पुटर इंजिनीरिंग या विषयामधे पीएचडी ही सर्वोच डिग्री मिळाली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

डॉ. रुपाली शिंदे यांच्या संशोधनाचा विषय "मशीन लर्निंग बेस्ड ऑन डीसीझेस क्लासिफिकेशन सिस्टम फॉर कोविड-१९ अँड डर्माटॉलॉजि युसिंग इंटरनेट ऑफ थिंग्स" असून १० हुन अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत. कोरिया तसेच लंडनमध्ये झालेल्या आंतराष्ट्रीय परिषदे मध्ये त्यांनी प्रेसेंटेशन्स दिलेली आहेत. त्यांच्या या संशोधनाला प्रो.नाम ली यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यांच्या या संशोधन साठी दक्षिण कोरिया मधील अतिशय प्रतिष्ठीथ अशी बीके-२१ फेलोशिप मिळाली होती. डॉ.रुपाली शिंदे यांचे बॅचलर डिग्री ही यादवराव तासगावकर इंजिनीरिंग कॉलेज, कर्जत मधून प्रथम श्रेणी मधून झाले असून मास्टर ऑफ इंजिनीरिंग आणि पीएचडी या दोन्ही डिग्री त्यांनी लग्नानंतर दक्षिण कोरियामधून मिळवल्या आहेत. साथीच्या रोगानंतर जगाला स्मार्ट हेल्थकेअरची गरज आहे आणि ती "आर्टिफिशल इंटेलिजन्स " आणि " इंटरनेट ऑफ थिंग्स " ऍप्लिकेशन्सद्वारे करता येते. विषाणूचा प्रसार टाळण्यासाठी त्यांनी परिधान करण्यायोग्य उपकरण आणि पर्सनल-ट्रॅकिंग प्रणालीचा वापर करून कोविड-१९ संक्रमित तसेच संशयित व्यक्तीची लवकर तपासणी करण्यासाठी एक प्रभावी तंत्र सादर केले. ऑटोमॅटिक अलर्ट मिळवण्यासाठी सेन्सर फ्यूजन ही पद्धत वापरली गेली आहे. त्वचेच्या कर्करोगाच्या वर्गीकरण त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात पूर्व प्रशिक्षित अशा "सी.एन.एन" मॉडेल वापरून ९९ % अचूकतेसह साध्य केले आहे. वेगवेगळ्या २३ त्वचेच्या आजारावर कॉम्पुटर-एडेड डिझाइन बनवले असून त्याची अक्युरसी ८० % आहे. त्यामुळे आपल्याला त्वचेच्या कर्करोगाची माहिती अगदी सुरुवातीच्या स्टेज मध्ये समजू शकते. वैद्यकीय तज्ञांना किफायतशीर आणि वेळेवर निदान करण्यात मदत करण्यासाठी " हेल्थ केयर इंटरनेट ऑफ थिंग्स (HIOT) " उपकरणाचा अवलंब करणे हे या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यांना प्रोत्साहित करणारे त्यांचे पती डॉ. किरण शिंदे हे सुद्धा कोरियामधेच कार्यरत आहेत.








# वडोद बाजार येथे पोलिसांचे पथसंचलन


आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** गणेशोत्सवानिमित्त वडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांचे पतसंचालन करण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे पोलीस कर्मचारी आर. डी. देशमुख, मालदे, इलियास शेख,बागुल, दत्ता मोरे, पोलीस होमगार्ड या पदसंचालन सहभागी झाले होते. वडोद बाजार व पिरबावडा येथील बाजारपेठेत गावात पतसंचलन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांनी शांततेत आपला गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन वडोद बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास मोरे यांनी केले आहे. यावेळी पोलीस कर्मचारी उपस्थीत होते.

# डाव्यांचा नकार

आधुनिक केसरी

इंडिया आघाडीतील घटक पक्षांची नुकतीच दिल्ली येथे बैठक झाली. या बैठकीनंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (मार्क्सवादी) पॉलिट ब्यूरोने (कम्युनिस्टांची उच्चाधिकार समिती) इंडिया आघाडीच्या समन्वय समितीमध्ये सामील न होण्याचा निर्णय घेतला आहे. त्याऐवजी आघाडीच्या इतर उपसमन्वय समितीमध्ये सहभागी होऊ, असे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाच्या पश्चिम बंगालच्या नेत्यांनी बैठकीत भाजपाला रोखण्यासाठी विरोधी पक्षांची आघाडी महत्त्वाची असल्याचे सांगितले. राज्यात सीपीआय (एम), काँग्रेस आणि इंडियन सेक्युलर फ्रंट (ISF) यांची आघाडी तृणमूल काँग्रेसच्या विरोधात चांगले काम करू शकेल. समन्वय समितीमध्ये सामील न होण्याच्या निर्णयाबाबत माहिती देताना पॉलिट ब्यूरोने सांगितले की, आघाडीतील सर्व निर्णय घटक पक्षांनी घ्यावेत. त्या ठिकाणी कोणतीही संघटनात्मक संरचना निर्माण केल्यास अडथळा निर्माण होऊ शकतो. सीपीआय (एम) पक्षाच्या उच्चाधिकार समितीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे आपली भूमिका मांडली. त्यात म्हटले की, भारतीय प्रजासत्ताकाचे लोकशाही स्वरूप, धर्मनिरपेक्षता, संविधान, लोकशाही, लोकांचे मूलभूत हक्क आणि नागरी स्वातंत्र्याचे रक्षण करण्याच्या प्रयत्नांना बळ देण्यासाठी इंडिया आघाडीला बळकट करणे आणि त्याचा विस्तार करण्याचे काम पॉलिट ब्यूरो करील, असा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रयत्नांसाठी भाजपाला केंद्र सरकार आणि राज्य सरकारांवर नियंत्रण ठेवण्यापासून दूर ठेवणे आवश्यक आहे. पॉलिट ब्यूरो या दिशेने प्रयत्न करील. प्रसिद्धिपत्रकात पुढे म्हटलेय की, इंडिया आघाडीच्या पाटणा, बंगळुरू व मुंबई येथे आतापर्यंत तीन बैठका झाल्या. या तीनही बैठकांमध्ये सीपीआय (एम)च्या भूमिकेला पॉलिट ब्यूरोने पाठिंबा दिला आहे. आगामी निवडणुकीत भाजपाला दूर ठेवायचे असेल, तर देशभरात जाहीर सभांचे आयोजन करून जनतेला एकत्रित करावे लागणार आहे. तसेच इंडिया आघाडीचा आणखी विस्तार करणे आणि हे प्रयत्न करताना त्याचे रूपांतर लोकचळवळीत कसे होईल, यावर लक्ष केंद्रित करायला हवे. इंडिया आघाडीचे सर्व निर्णय घटक पक्षांचे नेते घेतील आणि अशा निर्णयांना अडथळा ठरेल, अशी कोणतीही संघटनात्मक रचना असता कामा नये. सीपीआय (एम) च्या केंद्रीय समितीच्या सदस्याने सांगितले की, देश पातळीवर निवडणूकपूर्व आघाडी करण्यासाठी त्यांच्या पक्षाला काही अडचणी आहेत. या सदस्याने सांगितले की, इंडिया ही आघाडी असून, ते विविध राजकीय पक्षांना एकत्र आणणारे व्यासपीठ आहे; राजकीय पक्ष नाही. भाजपाला रोखणे आणि देशाच्या राज्यघटना वाचविणे यांसाठी इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली आहे. अनेक पक्ष नैतिक आणि राजकीयदृष्ट्या एकसारखे नाहीत. तरीही भाजपाला पराभूत करणे हा एक उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे पक्ष एकत्र येऊन चर्चा करीत आहेत. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात सर्व पक्ष सर्व मुद्द्यांवर सहमती दर्शवतील, अशी अपेक्षा करणे योग्य नाही. पंजाबमध्ये आम आदमी पक्ष काँग्रेसविरोधात लढाई करतो. दिल्लीतही तशीच परिस्थिती आहे. पश्चिम बंगालमध्ये आम्ही तृणमूल काँग्रेसच्या विरोधात लढणार आहोत; तर केरळमध्ये सीपीआय (एम) काँग्रेसविरोधात लढणार आहे. सीपीआय (एम) चे राज्य सचिव एम. डी. सेलीम म्हणाले, "इंडिया आघाडी ही काही राजकीय संघटना किंवा पक्ष नाही, ही भूमिका आम्ही सातत्याने मांडत आहोत. भाजपा आणि फॅसिस्ट शक्तींविरुद्ध जनमताची चळवळ उभी करण्यासाठी इंडिया आघाडीची स्थापना झाली आहे. केवळ राजकीय पक्षच नाही, तर व्यक्ती आणि बिगरराजकीय संघटनादेखील या चळवळीचा भाग असू शकतात.


डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# बलुतेदारांना नवसंजीवनी

आधुनिक केसरी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा योजना सुरू करून अर्थव्यवस्था सांभाळणाऱ्या बारा बलुतेदार कामगारांना नव संजीवनी दिली आहे. वर्षांवर शेगाव घोड्याची वा अर्थव्यवस्था सांभाळणारे बारा बलुतेदार आणि आदित्य जात यांची भूमिका अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असल्या मुळे त्यांच्या गुण कौशल्याला वाव मिळावा या उद्देशाने प्रेरित होऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विश्वकर्मा योजना समोर आणली. पंतप्रधाननरेंद्र मोदी यांच्या हस्ते.दिल्लीत विश्व कर्मा जयंतीच्या पार्श्व भूमीवर प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना अमलात आणण्याची घोषणा केली. पूर्वी प्रत्येक गावात बलूतेदारीं पद्धत ही प्रचलित होती. प्रत्येक गावात दैनंदिन जीवनातील देवाघेवाण करण्यासाठी जे व्यवहार होत असत ते पैशानी न होता वस्तुविनीमयाद्वारे होत असे. म्हणजेच त्या काळी ही वस्तूविनीमय पद्धत वापरण्यासाठी बारा बलूतेदार हे ठरविले गेले होते.**

यांच्या मार्फतच हे दैनंदिन व्यवहार होत असत.महाराष्ट्रात शेती हा मुख व्यवसाय असल्यामुळे शेतकऱ्याला फार महत्वाचे स्थान होते. शेतकरी हा धान्य पिकवून देत असे व शेती करीत नसलेले इतरं लोक हे त्याच्या नेमीच्या महत्वाच्या गरजा पूरविण्याचे कार्य करीत असत. ते म्हणजेच हे बारा बलूतेदार ( कारू ) हे लोक.
बलुतेदार हे गावाचे वतनदार असत व पिढ्यानपिढ्या तेच गावचे ठराविक कामे करीत असत. या बारा बलुतेदारांच्या ठिकाणी जे कौशल्य व गुण आहेत ते इतिहास जमा होत असतानाच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्याचा विकास करण्यासाठी व देशाच्या अर्थ व्यवस्थेला हाथभार लावण्याच्या दृष्टीने व त्यांना स्वावलंबी बनविण्याचा दृष्टीने विश्व कर्मा योजनेची घोषणा करून अशा कौशल्य युक्त कारागिरांना एक प्रकारे नवसंजीवनी दिली. विज्ञान तंत्रज्ञान व जागतिकीकरणाच्या युगात या वर्गाची मोठ्या प्रमाणात हेळसांड झाल्याची दिसून येते.. बारा बलुतेदार व अलुतेदार या घटकातील अनेक जण भूमी व दररोज मोड मजुरी करून आपला उदरनिर्वाह करणारे आहेत शहरी भागात बारा बलुतेदार व अठरा अनुत्तीधार यांचे अस्तित्व मोठ्या प्रमाणावर जाणवत नाही मात्र ग्रामीण भागात अजूनही सुतार लोहार कुंभार धोबी नावे सोनार कोळी पकाली ग्राम जोशी व गुरु हे बारा बलुतेदार तसेच तेली तांबोळी साडी संघर्षी माडी गोंधळी डवरी भट ठाकर गोसावी वाजंत्री घडशी तराळ करो भोई व शिवलगार आलूतेदार अस्तित्वात आहे अस्तित्वात आहे अस्तित्वात आहे. या लोकांना विशिष्ट कौशल्य आहे. कला आहे. च्या यांत्रिकीकरणाच्या युगात या कारागिरांजवळ असलेली कला लोप पावण्याच्या उंबरठ्यावर असतानाच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या कौशल्याला महत्व देण्यासाठी या वर्गाना विशिष्ठ रकमे पर्यन्त लोन देण्याची घोषणा केली.
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत, सरकार कारागिरांना दिलेल्या कर्जावर ८ टक्क्यांपर्यंत सबसिडी देईल. या योजनेंतर्गत कारगर ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज घेऊ शकतात, तेही केवळ ५ टक्के सवलतीच्या दराने. या योजनेत सुतार, सोनार, लोहार, गवंडी, दगडी शिल्पकार, नाई आणि खलाशी संबंधित १८ क्षेत्रांचा समावेश आहे. याअंतर्गत सरकार ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देणार आहे. सुरुवातीला १ लाख रुपयांचे




कर्ज दिले जाईल आणि १८ महिने पेमेंट केल्यानंतर, लाभार्थी २ लाख रुपयांच्या अतिरिक्त कर्जासाठी पात्र असेल. व्याजदर फक्त ५ टक्के राहील. अशा असंघटित क्षेत्रातील कारागिरांना आपली कला व कौशल्य दाखविण्याला आता वाव मिळणार आहे.
बलुतेदारी पद्धतीची बीजे भारतात नवाश्मयुगात रोवली गेली असावी. नवाश्मयुगातील शेती आणि गाववसाहती ही भारतीय माणसाच्या जीवनातील फार मोठी उत्क्रांती होय. माणूस समुहाने वस्ती करून राहू लागला. त्यामुळे आणि शेतीमुळे त्याच्या गरजा वाढल्या. गरजा पूर्ण होण्यासाठी माणसाला काही कौशल्ये आत्मसात करून घ्यावी लागली. त्यांवर आधारित निरनिराळ्या व्यवसायांची निर्मिती झाली. ती व्यावसायिक कामे कुशल माणसांवर सोपवली गेली. जसे, की मातीची भांडी, रांजण, मडकी ह्या दैनंदिन गरजेच्या वस्तू तयार करणारे कारागीर, शेतीच्या कामात येणारी शेतीची अवजारे (नांगर, वखर) तयार करणे- ती दुरुस्त करणे या आणि इतर अनेक कामांसाठी वस्तू निर्माण करणारे कारागीर तयार झाले. त्या तशा कारागीरांना त्यांच्या कार्याचा मोबदला अन्नधान्याच्या किंवा वस्तूंच्या स्वरूपात दिला जाई आणि तेथूनच विनिमय पद्धत रूढ झाली. गरजेनुसार वस्तुनिर्मिती करणारे कुशल कारागीर आणि निर्माण केलेल्या वस्तूंची देवाणघेवाण धान्याच्या किंवा इतर वस्तूंच्या रूपात करण्याची पद्धत असल्याबाबतचा उल्लेख नवाश्मयुगाच्या उत्तरार्धात आढळतो. कालांतराने, वेगवेगळ्या कुशल कारागीरांचा तो तो व्यवसाय झाला. ते व्यवसाय वंशपरंपरेने पिढ्यान् पिढ्या चालत परंपरागत झाले. ते ते काम करणाऱ्या कामाच्या विभागणीवरून जाती निर्माण झाल्या. जसे, लाकडापासून वखर, नांगर, तिफण, मोगाडे, डवरा आणि अशी शेतीवाडीशी संबंधित अवजारे तयार करणारे कारागीर म्हणजे सुतार (सुताराला ग्रामीण बोलीभाषेत 'वाढई' हे संबोधन वापरतात); लोखंडापासून फाळ, फास, विळे, खुरपे आणि तत्सम वस्तू तयार करणारे लोहार (खाती); न्हावी (माली); कपडे धुणारे धोबी (वरठी);पळसाच्या किंवा मोहाच्या पानापासून पत्रावळी तयार करणारे भुणिक; मेलेल्या प्राण्यांच्या चामड्यापासून चपला-जोडे तयार करणारे चर्मकार(चांभार); कपडे शिवणारे शिंपी अशा कुशल कारागीर असणाऱ्या समुहांच्या त्यांच्या त्यांच्या कार्याच्या विभागणीनुसार जाती अस्तित्वात आल्या. तसे कुशल कारागीर पुढे बलुतेदार म्हणून नावारूपाला आले. स्थलकालपरत्वे, वेगवेगळ्या प्रांतांत आणखी काही बलुतेदार असल्याचा उल्लेख इतिहासात मिळतो. 'बलुतेदार' हा शब्द बऱ्याच खेड्यांत व्यावहारिक दृष्ट्या वापरला जात नाही. तर सुतार, लोहार, धोबी, न्हावी यांच्यासाठी त्यांच्या भागात 'आयकिरी' हा शब्दप्रयोग करतात. आयकिरी हा शब्द प्रमाणभाषेतील नसावा. तो शब्द मराठी शब्दकोशात आढळून येत नाही. 'आयकिरी' शब्दाला समान वेगवेगळे शब्दप्रयोग स्थानिक बोलीभाषांत असू शकतात.
काळ बदलला व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. नवीन पिढीने शिक्षणाला महत्त्व देत परंपरागत चालत येणारे व्यवसाय सोडले. कामाचे स्वरूप यंत्र आणि तंत्रज्ञान यांचा वापर करून बदलून घेतले. व्यवसायकौशल्य ज्ञान-विज्ञानाने फार विकसित झाले. राहणीमान बदलले. पैसा नावाच्या वस्तूला महत्त्व आले आणि विनिमय पद्धत हद्दपार झाली. ग्रामीण भागातील परंपरेने चालत आलेली वस्तुविनिमयाची बलुतेदारी संपुष्टात आली. मात्र काळानुसार व यांत्रिकी कर्णाच्या युगात वर्गातील गुण कौशल्याला महत्त्व मिळवून देण्यासाठी परत एकदा प्रयत्न होताना दिसतो आहे.


गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# दगड शेवटच्या घावाने तुटतो याचा अर्थ पहिला घाव व्यर्थ जातो असे नाही

आधुनिक केसरी

**जीवन हे यश अपयशाचा लपंडाव आहे.सातत्य निरंतरता हा यशस्वी होण्यासाठी प्रभावी मंत्र असतो. सातत्य आणि निरंतर प्रयत्न असतील तर जगात अशक्य काहीच नाही.आपण जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा कोणत्याही क्षेत्रातील यश हे पाहिल्या प्रयत्नात आपल्याला मिळेलच असं नाही. पण पाहिल्या प्रयत्नात यश मिळाले नाही म्हणजे ते मिळणार नाही असं नाही त्या साठी आणखी प्रयत्न करावे लागतील एवढाच त्याचा अंतिम अर्थ असतो. मग शेवटी यश हे मिळणारच. सृष्टीवर कठिण अस काहीच नसतं.पण त्यासाठी खडतर संघर्ष करत अहोरात्र मेहनत घेतली गेली पाहिजे.**

सातत्य टिकवून ठेवल तर एक दिवस आपण यशाला गवसणी घालणारच या मध्ये तीळमात्र शंका नाही. अपयश ही यशाची पहिली पायरी असते. पहिली पायरी चढल्या शिवाय शेवटची पायरी येत नाही दगड हा कधी पहिल्या घावात तुटतो तर कधी कधी अनेक घाव घालावे लागतात. दगड शेवटच्या घावाने तुटला तर पहिला घाव व्यर्थ जात नाही. महणुन दगड तुटेपर्यंत प्रयत्न थांबवता कामा नये.यशाच्या संदर्भातील संकल्पना, परिकल्पना, व्याख्या हि प्रत्येकाच्या दृष्टीने अनुभव परत्वे वेगवेगळी असु असते .अपयशाचे पण तसेच आहे म्हणजे यश अपयशाचे मुल्यमापन हे प्रत्येकाच्या लेखी सारखं नसतं . एखाद्याला अगदी पाहिल्या प्रयत्नात यश मिळत तर एखाद्याला अगदी अगदी प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर यशाचा ताळमेळ लागतो . म्हणजे व्यक्तीपरत्वे यशाची संकल्पना वेगळी आहे.अनेकदा दगड हा पाहिल्याच घावात तुटतो .तर कधी कधी अगदी शेवटच्या घावाने तुटतो .आता पहिला घाव आणि शेवटचा घाव या मधील अंतर सुद्धा वेगळं असत . फक्त निरंतर प्रयत्न केले तर मग मात्र पहिला घाव व्यर्थ जात नाही. हे वास्तव आहे पण प्रयत्न खंडीत झाले अथवा मध्येच धेय्य बद्दल झाला किंवा आपण थकलो त्याच बरोबर प्रयत्न करण्याचा नाद सोडला .तर मग मात्र पहिला घाव व्यर्थ गेला म्हणून समजा .आणि पहिला घाव व्यर्थ जाऊ देयचा नसेल तर प्रयत्ना मध्ये सातत्य टिकवून ठेवणं आवश्यक आहे. महणुन कोणताही प्रयत्न हा अंतिम प्रयत्न कधीच नसतो .म्हणूनच प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे .अनंत आणि निरंतर प्रयत्न हे अशक्यप्राय बाब शक्य करू शकतात . नेमकं साध्य मिळण्याच्या वेळी आपण दुर्लक्ष केलं तर फार काही उल्लेखनीय उपयोग होत नाही . पहिल्या प्रयत्नात यश पदरात पडल अस खुप कमी लोकांच्या बाबतीत घडतं पण जर आपल्याला पहिल्या प्रयत्नात यश मिळाले नाही तर मग आपण प्रयत्न बंद करायचे का ? तर नक्कीच नाही.आपण प्रयत्न बंद केले तर आपला पहिला घाव व्यर्थ जाईल .आणि दगड फुटतच नाही असा आपल्या सह इतर अनेकांचा समज होईल .पण हा समज सत्य नाही . म्हणून अनेकदा यश मिळण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. तेव्हा कुठे अगदी शेवटच्या क्षणापर्यंत सातत्य टिकवून ठेवल. तर शेवटच्या क्षणी यश पदरात पडत. म्हणून पहिला प्रयत्न केल्यानंतर यश मिळेपर्यंत अंखडीत पणे प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत .यश हे मिळणारच या मध्ये काहीही शंका नाही.पहिला घाव घातला आणि घाव घालण बंद केलं तर दगड तोडण्याचा उपक्रम आपल्या नावावर नोंदविला जाऊ शकत नाही.किंवा शेवटाचा अंतिम घाव घालण्या आगोदरच आपण प्रयत्न बंद केले तरीही दगड तोडण्याचा उपक्रम आपल्या नावावर नोंदविला जाणार नाही.पहिल्या घावा पासुन शेवटच्या घावा पर्यंत सातत्याने अंखडितपणे प्रयत्न चालू ठेवले तरच दगड तोडण्याचा उपक्रम आपल्या नावावर नोंदविला जातो .हे अगदी सरळ सरळ गणित आहे म्हणजेच पहिला घाव हा कधीच व्यर्थ जात नाही. हे जरी सत्य असल तरी पण शेवटच्या घावा पर्यंत प्रयत्न बंद नाही झाले पाहिजे.तरच आपल्या पहिल्या घावाला महत्व आहे.महणुन दगड हा कधीही शेवटच्या घावानेच तुटतो .याचा अर्थ असा होत नाही कि आपला पहिला घाव हा व्यर्थ जातो . हिच समांतर परिस्थिती आपल्या जीवनातील आहे. आपण आपल्या जीवनात वेगवेगळ्या क्षेत्रात जेव्हा यशस्वी होण्यासाठी आपण प्रयत्न करत असतो . तेव्हा काही लोकांना अगदी पहिल्याच प्रयत्नात यश मिळत .आणि काही लोकांच्या वाट्याला अपयश येत.आता ज्यांच्या बाबतीत अपयश आलं त्यांनी निराश नाराज नाही झालं पाहिजे.आणि तणाव न घेता आपल्याला ज्या संदर्भात यश मिळवायचं आहे .त्या अनुषंगाने अंखडीत प्रयत्न बंद न करता. नियमित पणे सातत्य ठेवुन नियमित प्रयत्न केले पाहिजे.जेणेकरून आपला पहिला घाव व्यर्थ जाणार नाही .आपण सातत्याने प्रयत्न केले तर एक दिवस यश आपल्याला नतमस्तक झाल्याशिवाय राहणार नाही.पण जर आपल्या प्रयत्नांमध्ये खंड पडला नाही तर आणि यदाकदाचित खंड पडला तर मग मात्र आपला पहिला प्रयत्न व्यर्थ जाईल .म्हणून प्रयत्न करत असताना एकदा सुरुवात केली कि यश पदरात पडेल तेव्हाच खऱ्या अर्थाने थांबलं पाहिजे.मग विषय कोणताही असो. दगड तुटतोच प्रयत्न थांबले नाही पहिजेत तसंच यश हे मिळतच पण प्रयत्ना मध्ये सातत्य टिकवून ठेवल पाहिजे आणि प्रयत्ना मध्ये खंड नाही पडला पाहिजे.महणुन सुरवातीचा पहिला प्रयत्न ते यश मिळेपर्यंतचा प्रयत्न हाच यशाचा प्रवास आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९


Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जगाला डाव्यांच्या संकटापासून मुक्त करण्याचे भारतावर दायित्व

## डॉ. मोहन भागवत यांचे प्रतिपादन : अभिजित जोग यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सांस्कृतिक मार्क्सवादाच्या नावाखाली डाव्या विचारसरणीच्या लोकांनी जगभर विध्वंस सुरू केला असून, डाव्यांच्या या संकटापासून जगाला मुक्त करण्याचे दायित्व भारतावरच आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी आज येथे केले.
लेखक अभिजित जोग यांच्या 'जगाला पोखरणारी डावी वाळवी' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. भागवत यांच्या हस्ते सिम्बॉयोसिस विश्वभवन सभागृहात झाले, त्यावेळी डॉ. भागवत बोलत होते. 'दिलीपराज प्रकाशन'ने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शांतिश्री पंडित, दिलीपराज प्रकाशनाचे व्यवस्थापकीय विश्वस्त राजीव बर्वे, अभिजित जोग यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.
जगभरच्या सर्व मंगलाविरोधातच डावे आहेत. त्यामुळे सांस्कृतिक मार्क्सवादाच्या नावाखाली जगभर व विशेषतः पाशात्य देशांत डाव्यांनी मांगल्याच्या विरोधात भूमिका घेत विध्वंस सुरू केला आहे. विमर्शाच्या नावाखाली चुकीचे विचार समाजात रुजवण्याचे प्रयत्न डाव्यांनी सुरू केले आहेत. त्यातून समाजाचे नुकसानच होत असून, मानवी वर्तन पशुत्वाकडे झुकते आहे. डाव्यांचे हे संकट आता भारतावरही येते आहे. आपल्या समाजातच नव्हे, तर घराघरांपर्यंत ते पोचते आहे. त्यामुळेच भारतीय समाजाने अधिक सजग राहणे आवश्यक असल्याचे डॉ. भागवत यांनी सांगितले. आज आपल्याला दिसतो हा संघर्ष नवा नाही. देव आणि असुरांमधील संघर्षाचेच हे आधुनिक रूप आहे, असे सांगून डॉ. भागवत म्हणाले की,




"डाव्यांच्या या संकटातून वाचवण्याचे सामर्थ्य भारतीय संस्कृती आणि सनातन मूल्यांत आहे. डाव्यांचा विमर्श खोडून काढण्यासाठी सत्य, करूणा, सूचिता आणि तेजस या चतुःसूत्रीचा अंगिकार समाजाने केला पाहिजे. आपली सनातन मूल्ये नव्या पिढीपर्यंत पोचवली पाहिजेत. भारताने इतिहासकाळापासून अशी संकटे पचवली असून, हे संकट पचवण्याचीही भारतीय समाजात ताकद आहे. सनातन मूल्यांची कास धरून सर्व समाज हे काम करू शकतो. त्यासाठी अशी अनेक पुस्तके सर्व भाषांमधून प्रकाशित झाली पाहिजेच. अन्य मार्गांनीही आपली मूल्ये, आपला विचार घराघरापर्यंत पोचवला पाहिजे. हे कोणा एका संघटनेचे काम नसून सर्व समाजाचे हे दायित्व आहे. त्यातून आपण फक्त आपला देशच नव्हे, तर जगालाही या संकटा पासून मुक्त करू शकतो", असे डॉ. भागवत यांनी सांगितले.
"डाव्यांनी आपला विचार पुढे रेटण्यासाठी, तसेच तो प्रस्थापित करण्यासाठी भक्कम इको सिस्टीम उभी केली आहे. डाव्यांना चोख वैचारिक उत्तर देण्यासाठी आपणही अशीच भक्कम इको सिस्टीम उभी केली पाहिजे. आपले विचार, आपली मूल्ये जगापुढे मांडताना आपण घाबरू नये", असे डॉ. पंडित यांनी सांगितले. "ईर्ष्या, द्वेष व अराजक हाच डाव्यांच्या विचारांचा गाभा आहे.त्यातून जगभर ते कसा विध्वंस करत आहेत, याचे चित्रण आपण या पुस्तकातून केले आहे", असे जोग यांनी सांगितले. बर्वे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. हे संस्थेचे २७९० वे पुस्तक असल्याची माहितीही त्यांनी दिली. सिम्बॉयोसिस संस्थेच्या वतीने संस्थेचे संस्थापक प्रमुख डॉ. शां. ब. मुजुमदार व डॉ. विद्या येरवडेकर यांनी डॉ. भागवत यांचा सन्मान केला. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले, तर मधुमिता बर्वे यांनी आभार मानले.




## सकल मराठा समाज आंदोलनाला शेकापचा पाठिंबा : आशाताई शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज पाटील जरांगे यांनी आमरण उपोषणास सुरुवात केली होती, यावेळी पोलिसांच्या वतीने मराठा समाजावर लाठी हल्ला केला गेला ही बाब महाराष्ट्राच्या संस्कृतीला कलंकित करणारी असून या लाठी हल्ल्याचा मी जाहीर निषेध करत असल्याचे शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांनी लोहा येथे मराठा आरक्षण उपोषणकर्त्यांशी बोलताना सांगितले.
काल सोमवार दिनांक 18 सप्टें रोजी लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सकल मराठा समाज मराठा आरक्षण उपोषणास शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्ते सौ. आशाताई शामसुंदर शिंदे यांनी भेट दिली, यावेळी आशाताई शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले, यावेळी शेकापच्या महाराष्ट्र राज्याच्या वतीने मराठा आरक्षण उपोषणास जाहीर पाठिंबाचे पत्र लोहा येथील सकल मराठा समाजाच्या उपोषणकर्त्या कार्यकर्त्यांना शेकाप महिला प्रदेशाध्यक्षा आशा ताई शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले ,यावेळी उपोषणकर्त्यांशी संवाद साधताना आशाताई शिंदे म्हणाल्या की मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथील मनोज पाटील जरांगे व नांदेड जिल्ह्यातील दत्ता पाटील हडसणीकर यांच्यासह महाराष्ट्रातील सर्व मराठा आरक्षण उपोषणकर्ते व मराठा आरक्षण आंदोलनाला व सकल मराठा समाजाच्या मराठा आरक्षण आंदोलनाला व मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी व सकल मराठा समाजाच्या आरक्षणासाठी शेतकरी कामगार पक्ष व मी सदैव मराठा समाजाच्या सोबत भक्कमपणे सोबत असल्याचे यावेळी आशाताई शिंदे यांनी लोहा येथील सकल मराठा आरक्षण उपोषण कार्यकर्त्यांशी बोलताना सांगितले, यावेळी खरेदी विक्री संघाचे उपसभापती श्याम अण्णा पवार, सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर, तालुका अध्यक्ष नागेश पाटील हिलाल, संचालक सुधाकर सातपुते, सिद्धू वडजे, दिगंबर डिकळे, आनंद देशमुख लोंढेसांगवीकर सह शेकाप कार्यकर्ते, पदाधिकारी व बहूसंख्येने उपस्थित होते.

## 'पाणक्या' कथासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रसिध्द बालसाहित्यिक बाबा भांड यांच्या हस्ते नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथील बाबा भांड यांच्या निवासस्थानी ग्रामीण साहित्यिक तथा पाठय पुस्तकातील कवी " पाणपोईकार " अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या साहित्य अकादमीच्या नामंकात पुरस्कार यादीत समाविष्ठ असलेला आणि साहित्य क्षेत्रात अतिशय गाजलेला, "पाणक्या" या आशयघन आणि वाचनीय कथासंग्राहाचे प्रकाशन थाटात पार पडले. "पाणक्या " या कथासंग्रहात एकूण दहा वास्तववादी आणि दर्जेदार वाचनीय कथांचा समावेश आहे. या प्रसंगी बालसाहित्यिक बाबा



भांड,कवी एम. एम. खुटे, शेख जाहेद हुसेन, जफरखान पठाण, रय्यान जाहेद शेख, मुदस्सीर पठाण कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांची उपस्थिती होती. बाबा भांड यांनी अय्युब पठाण लोहगांवकर यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील साहित्य लेखणास शुभेच्छा दिल्या.




महाराष्ट्र Business Katta












# गावगाडा आणि विकास



डॉ.बलराज पांडवे
मो.नं. 9511885093

आधुनिक केसरी

**पूर्वी खेड्यामध्ये एक वेगळेच वातावरण होते. शहरी राहणीमान, शहरी सवयी अशा गोष्टीपासून ग्रामीण भागातील लोक अपरिचित होते. जो तो ज्याच्या त्याच्या कामांमध्ये मग्न असायचा. तालुक्याच्या ठिकाणी क्वचितच जाणं-येणं असायचं. त्यामुळे शहरी जीवनाशी तेवढा संबंध येत नव्हता. सकाळी आणि संध्याकाळी मंदिरात जाऊन दिवा लावणे, देवाचे दर्शन घेणे हे मात्र सर्वजण अगदी न चुकता करत असायचे. सकाळी आणि संध्याकाळी गावामध्ये गजबजल्यासारखे वाटायचे. पिठाच्या गिरणीचा तो आवाज, जनावरांचा हंबरण्याचा आवाज, विहिरीवर पाणी काढताना होणारी गर्दी, किराणा दुकानावर सामान घेणाऱ्याची गर्दी, कधी कधी जात्याचा घरघरणारा आवाज, मिरची कांडताना येणारा उकळीचा आवाज, सर्व कसे जीवंतपनाचे लक्षण वाटायचे. सकाळ संध्याकाळ गावच्या चावडीवर सर्व लोक जमायचे, बी बियाणाबाबत चर्चा करत असायचे, पेरणीबाबत, पिकाबाबत, खुरपणी बाबत, कोळपणी बाबत आपापसात विचार विनिमय करत असत.**

त्यातून शेतीबाबत ची माहिती एकमेकांना मिळत होती. एकमेकांच्या अडचणी सांगून त्या चर्चेने सोडवल्या जात होत्या. किरकोळ समस्या बाबत विचार विनिमय करून समस्या सोडवण्याचा मार्ग निघत असे. एकमेकांच्या दुःखात सहभागी होऊन एकमेकाला आधार देण्याचे काम सहजासहजी होत असे .जात ,धर्म ,पंथ ह्या गोष्टी बाजूला ठेवून एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होणे ही एक खेड्यातील जिव्हाळ्याची संस्कृतीच म्हणावी लागेल!

पेरणीच्या दिवसात व सुगीच्या दिवसांमध्ये साऱ्या गावांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसून यायचे. सुतारा कडे व लोहाराकडे शेती उपयोगी अवजारे बनवण्यासाठी लोकांची गर्दी व्हायची .सुतारा कडे बसल्यानंतर "न्हायावर "गावातील बऱ्याच चांगल्या बाबींची चर्चा व्हायची. अगदी रामायण व महाभारतातील चांगल्या गोष्टी एकमेकांना सांगताना ऐकावयास मिळत असे. त्यामुळे भावाने भावाशी कसं वागाव ,मुलांनी वडिलांशी कसं वागावे ,गावामध्ये गुण्यागोविंदाने कसे राहावे सामाजिक बांधिलकी व गाव गाड्यांच्या दृष्टीने समाजात वावरताना काय दक्षता घ्यायची, ह्या सर्व बारीक सारीक समाज-अभिमुख गोष्टी शिकवण्यास व ऐकण्यास मिळत होत्या. गावामध्ये पावसाळ्याच्या दिवसांमध्ये पारायण सुरू राहायचं. त्या "पोथी "वाचनामध्ये सर्व ग्रामस्थ बाया बापडे सर्वजण "पोथी' ऐकण्यासाठी धावत पळत जमायचे .दिवसभराचे काम करून थकून भागून आल्यानंतरही मोठ्या आवडीने "पोथी "ऐकण्यासाठी सर्व ग्रामस्थ एकत्र यायचे. खरोखरच मला माझ्या गावी लहानपणी अनुभवलेले क्षण अजही चांगले आठवतात.

खेड्याची आजची परिस्थिती तशी बरीच बदललेली दिसून येत आहे. ग्रामीण जनतेचा संपर्क शहराशी बऱ्यापैकी येत आहे. टेलिव्हिजन वरील बऱ्याच प्रोग्राम मधून नित्याच्या घडामोडी रोज ऐकावयास मिळणे सोयस्कर झाले आहेत.पूर्वी असे गावांमध्ये दिसून येत नव्हते. गावामध्ये करमणुकीचे कोणतेच साधन नव्हते. गावात फक्त ग्रामपंचायत मध्ये एक रेडिओ असायचा. त्यावरचे कार्यक्रम अलीकडच्या काळात ऐकावयास मिळायचे. गावात वर्तमान पत्र आता वाचावयास मिळत आहेत. गावात गुरुजींना खूप लोक माणायचे .त्यांचा आदर सर्वजन करायचे. आमचे सर जर गावातून जात असतील तर सर्वजण अगदी आनंदाने सरांना नमस्कार करायचे. परंतु आजचे बदललेले चित्र तसे बरेच काही सांगून जाते. कोणीही कितीही मोठा अधिकारी अथवा लोकप्रतिनिधी आला तरी लोकांना थांबायला वेळच नाही. जो तो आपापल्या कामांमध्ये व्यस्त आहे. गावातील समस्या, आवश्यक असलेल्या योजना, याबाबतीत काही मोजकेच व्यक्ती सातत्याने झटत असताना दिसतात. एकदा का सरपंचांना निवडून दिले की बस !आपले काम झाले असे प्रत्येकाला वाटत असते. गावात कोणती योजना आणायची, काय विकास करायचा याबाबतीत कोणीही गांभीर्याने घेत नसल्यामुळे खेडेगावातील समस्या म्हणाव्या तेवढ्या अजून सुटलेल्या दिसून येत नाहीत.

प्रत्येक जण यंत्रमानवासारखा यंत्रासोबत काम करत असताना दिसून येत आहे.या बाबींकडे लक्ष देण्यासाठी कुणाही वेळ नाही. कदाचित त्यांना असे वाटत असेल की, हे आमचे काम नाही. आपण काय करणार नाईलाज आहे ! असे शब्द ऐकल्यावर खरोखरच आश्चर्य वाटते. गावातील विविध शासकीय इमारती, त्या गावची मालमत्ता आहे .याची जाण अजूनही जनमानसात रूजली नाही. त्याकडे लक्ष देण्यासाठी कोणासही पुरेसा वेळ नाही.

आजच्या या काळात गावागावात चौफुली वरती हॉटेल्स, पान टपरी, मोबाईल शॉपी, खताचे दुकान विविध दैनंदिन गरजेचे वस्तू मिळणारे दुकान व



मिळणाऱ्या सर्व सहज सुलभ साधनसामुग्री मिळत असल्यामुळे कसल्याचअडचणी येतात असे वाटत नाही. त्यामुळे प्रत्येक जण मी व माझा परिवार या एवढ्याच मर्यादेमध्ये स्वतःला बांधून घेऊन आपले जीवन जगत असल्याचे पदोपदी अनुभवायला मिळत आहे. परंतु गावातील ग्रामस्थांच्या समस्या बाबतीत म्हणावे तेवढ्या गांभीर्याने कोणी घेत नसल्याचे आज तरी बऱ्याच ठिकाणी दिसून येत आहे. चहाचे हॉटेल्स ,पान टपरी या ठिकाणी मात्र बरीचशी गर्दी खेड्यातच नव्हे तर शहरांमध्ये बघावयास मिळते. गुटका, पान ,तंबाखू, सिगारेट इ. वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. या सर्व वस्तूमुळे आरोग्यावर याचे काय दुष्परिणाम होतील याबाबत विचार करण्यासाठी कुणासही वेळ नाही. पूर्वी गावांमध्ये भजन, कीर्तन होताना बऱ्याच लोकांची गर्दी होत असे. चार चांगले शब्द ऐकायला मिळतील म्हणून सर्वजण वेळ काढून सहभागी व्हायचे .आजची परिस्थिती बरीच बदललेली दिसून येत आहे. घरामध्ये सर्व सुख सोयी बऱ्यापैकी उपलब्ध असल्यामुळे घरातच कार्यक्रम पाहत बसणे लोकांना आवडत आहे आणि लोकांची मानसिकता थोडीशी एकलकोंडी झालीआहे असे जाणवते.

खेडेगाव आता खेडे राहिले नसून ,शहरासारखेच अनूकरण करणारा समाज निर्माण होत आहे. त्यामुळे हा विकास आहे का ?बदल आहे समजणे कठीण आहे. विकासाची कास धरून विकास घडवून आणणे ही चांगलीच गोष्ट आहे. परंतु तशाप्रकारे इमाने ईतबारे काम करणारे, माझे गाव, माझा तालुका, माझा जिल्हा, माझा प्रांत, माझा देश ,याचा सर्वांगीण विकास घडून आणणे या देशाच्या नागरिक म्हणून माझे आद्य कर्तव्य आहे या भावनेतून विकास होणे महत्त्वाचे वाटते. काही गावांमध्ये याच भावनेने विकास होताना आपण पाहतो आहे. समाजाच्या प्रती, गावाच्या प्रती, परिवर्तनाची बांधिलकी समजून अहोरात्र कष्ट करणारे निस्वार्थपणे झटणारे बहुसंख्ये लोके आजही गाव पातळीवर ग्रामविकास करण्यासाठी झटत आहेत. महात्मा गांधींनी सांगितले होते, "खरा भारत पाहायचा असेल तर खेड्यात जा " ग्रामीण जीवनाचे मूल्य, ग्रामीण जीवनात जगत असताना मनस्वी मिळणारा आनंद, आपलेपणाची भावना, आपल्या गावाच्या मातीतच पहावयास मिळते यात कसलेही दुमत नसावे असे मला वाटते!

परंतु आजच्या घडीला खेडेगावातील व्यक्तीलाही मोठ्या शहरांमध्ये जाऊन काहीतरी उद्योग व नौकरी करावी व आपल्या कुटुंबाचा व आपल्या मुलाबाळांचा योग्य तो विकास करावा वाटतो. या भावनेतून बरीचशी माणसं शहरांमध्ये येऊन राहत असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे खेडेगावांमध्ये राहणाऱ्यांची वस्ती कमी होत चालली आहे. तसे पाहिले तर शहरांमध्ये येऊन मुला बाळांचे शिक्षण, मुलाबाळांच्या विकासासाठी धडपडत राहणे ही योग्यच बाब आहे .परंतु या वाढत्या सिमेंटच्या जंगलामध्ये कधी कधी आपण आपले गाव विसरत तर चाललो नाही ना याची जाणीव प्रत्येक व्यक्तीला असणे गरजेचे आहे. शेवटी आपलं जन्मगाव तिथली माती या मातीशी आपले असलेले संबंध हे जिव्हाळ्याचे अतूट आहेत ही भावना मनामध्ये कायम राहिली पाहिजे. शेवटी मला एवढेच सांगावेसे वाटते की बदलत्या युगा नुसार बदलत चाललेल्या गोष्टींचं अनुकरण करत असताना आपल्या जुन्या गोष्टी जे की जीवनमूल्य शिकवतात त्यां गोष्टीही आपण अंगीकृत केले पाहीजे, जपले पाहिजे. माणसाने माणसासाठी माणसासारखे वागणे हेच मानवतेचा धर्म आहे ही खून गाठ मनात रूजवणे आवश्यक आहे असे म्हणावे वाटते......!

# आंबेडकरी विचारवेध परिषदेची आवश्यकता

आधुनिक केसरी

**आंबेडकरी कार्यकर्ता हा चळवळीच्या अंगाने विविध पातळ्यांवर काम करीत असतो. आंबेडकरी विचारधारेशी असलेली त्याची निष्ठा त्यानेच निश्चित केलेल्या ध्येयवादापासून तसूभरही मागे असू शकत नाही. त्याची कृती ही एक तर सामाजिक किंवा सांस्कृतिक असते. या संबंधाने त्याने केलेल्या अनेक कृती आंबेडकरी विचारांचाच वेध घेत असतात. हा विचार एके ठिकाणी समर्पणाचा, न्यायबंधुत्वाचा, समता स्वातंत्र्याचा वेध घेत असतो, बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचाही वेध घेत असतो तर दुसरीकडे हा विचार क्रांतीची ज्वाला म्हणूनही धगधगत असतो. बाबासाहेबांच्या नंतर म्हणजे आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळ जशी उभी राहिली तशी ती दीर्घकाळ टिकली नाही.  यावरून सर्वसामान्य आणि निष्ठावंत आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या बाबतीत शंका घेण्याचे काही कारण नाही. आजही आपापल्या पद्धतीने आंबेडकरी कार्यकर्ता आपल्या कार्यक्षेत्रात काम करीत असतो.**

आंबेडकरी कार्यकर्ता हा राजकीयच असतो असे नाही. तो कोणत्याही विषयावर, कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही क्षेत्रात आंबेडकरी विचारधारा मध्यवर्ती ठिकाणी ठेवून कार्य करीत असतो. चळवळीतील गटातटांच्या आणि विविध राजकीय पक्षांच्या संदर्भाने हे कार्य विखुरलेल्या स्वरुपात आपल्याला दिसते. हे असे असू नये ही सगळ्यांचीच इच्छा असते परंतु लोकांची आजच्या परिस्थितीत एकत्र येणे, दुसऱ्याचे नेतृत्व स्विकारण्याची अंतिम मानसिकता दिसून येत नाही, अशी असणारी परिस्थिती सर्वत्रच आहे.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर, संविधानाच्या अंमलबजावणीनंतरच्या कालखंडानंतर आंबेडकरी चळवळीने काय कमावले आणि काय गमावले हा विचारही कुणाच्या मनाला शिवत असेल असे वाटत नाही. आपण स्वतःला आंबेडकरी म्हणवून घेत आपले इतरांसोबत असणारे स्वार्थापोटी असणारे संवाद संबंध कसे विकसित करता येतील ह्याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले आहे. मताधिकार कुणालाही विकू नये म्हणून मोठ्या प्रमाणावर आग्रह धरला जात असताना त्याच्या कितीतरी पटीने त्याविरुद्ध योग्यवेळी ती कृती होतांना दिसते आहे. म्हणजे निवडणूक आणि मताधिकाराची राजरोस विक्री हे समीकरण जणू काही पिढ्यान् पिढ्या चालत आलेली महान परंपराच आहे असे चित्र त्यावेळी अगदी ठळकपणे निर्माण होते याचा अनुभव आपण सर्वचजण घेत असतो. हे एक उदाहरण याठिकाणी अत्यंत महत्त्वाचे मानले तर या संबंधाने बेरोजगारी, चंगळवाद, प्रखर जातीयता यासारखे इतर तत्सम मुद्दे म्हणजे त्या समस्याच आहेत किंबहुना ती चळवळीपुढील आव्हानेच आहेत असे म्हणायला हरकत नाही.  याहीपेक्षा आंबेडकरी कार्यकर्त्यांनी एकत्र न येण्याचे आणि आपापली दुकानदारी चालविण्याचे सर्वात मोठे आव्हान आज साहित्यिक विचारवंतांच्या समोर आहे. कारण विषमतावाद, जातीयवाद, धार्मिक कट्टरतावाद अशा संकल्पनांविरुद्ध लढा देणे एकवेळ सोपे जाईल मात्र आपापसांतील हाडवैर संपवणे कठीण आहे. हे संपवून आपण सगळ्यांनीच एकत्र येणे आणि एकतेचे सौंदर्य प्रस्थापित करणे ही काळाची गरज आहे आणि यासाठीच आंबेडकरी विचारवेध परिषदांची आवश्यकता आहे असे वाटते.

आंबेडकरी तरुणांची संख्या देशभरात भरमसाठ असली तरी तो या विचारधारेशी खूप कमी प्रमाणात जुळला असल्याचे दिसते. चैत्यभूमी, दीक्षाभूमी, भीमा कोरेगाव अथवा महू वा कोणत्याही बौद्ध पर्यटनस्थळी गर्दी होणे ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. याबरोबरच तरुणांचा ओढा आंबेडकरी निष्ठांशी एकरुप होणे आवश्यक आहे. याऊलट व्यसनाधीनता, अंत्यातिक चंगळवाद, शान-शौक याकडे अधिक ओढा जात असलेला दिसतो. हाताला काम नसणे आणि शिक्षण होऊनही मोठ्या समुहाला नोकरी नसल्याने आपसूकच तरुण वाईट कुकर्माकडे झुकला आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्यांची किंवा आपले करिअरबाबत गंभीर असणाऱ्या तरुणांची संख्या तुलनेने कमीच आहे. त्यामुळे त्यांचे करिअर आणि आंबेडकरी वैचारिकता या दोन्ही गोष्टींपासून फारकत न घेता आजच्या तरुणांनी चळवळीची धुरा आपल्या खांद्यावर घेतली जाणे गरजेचे आहे. यासाठी आंबेडकरी तरुणांनी वाचनाकडे जास्तीत जास्त वेळ द्यायला हवा. सतत मोबाईलमध्ये गुंतुन राहणे आणि समाज माध्यमावरचीच ही क्रियाशीलता म्हणजे चळवळ समजणे या दोन्ही बाबी तरुणांना आंबेडकरी निष्ठांकडे वळविण्याच्या प्रयत्नांतील प्रमुख अडसर बनले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी मागील अनेक पिढ्यांपासून चालत आलेली अपार श्रद्धा पुढील पिढ्यांमध्ये येऊन तरुणांनी मोठ्या प्रमाणावर भावनिक असणे साहजिकच आहे. या युवा शक्तीचा समाजासाठी योग्य उपयोग होणे आवश्यक आहे.

पिढी दर पिढी जातीयवादाचा शिकार प्रामुख्याने आंबेडकरी तरुणच राहिला आहे. समाजात सतत होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात त्याला तीव्र चीड असल्यामुळे समाजव्यवस्थेशी संघर्ष करण्यासाठी तो अग्रेसर होता आणि आजही आहे. काही वेळा अशी परिस्थिती निर्माण होते की चीड येत नाही हाच गुन्हा ठरतो. आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी तो आपला स्वाभिमान गहाण टाकतो. तरीसुद्धा समाजावरील अन्याय



अत्याचाराविरोधात तो एकवटतोच! एकेकाळी ज्वलज्जहाल असलेल्या दलित पँथर या आंबेडकरोत्तर आंबेडकरी चळवळीला आता पन्नास वर्षे पूर्ण होताहेत. या औचित्याने समाजावरील वाढत्या अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर नांदेडला एकदिवसीय राज्यस्तरीय आंबेडकरी विचारवेध परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जेव्हा केव्हा समाजातील तरुण, तरुणी, स्त्री, पुरुष, बालक बालिका यांचा आजही अनन्वित छळ होतो तेव्हा आज अस्तित्वात असलेल्या अनेक संघटना त्वरित प्रतिक्रिया देतात. घटनास्थळी भेट देतात. विविध मागण्या केल्या जातात. मोर्चे, आंदोलनं केली जातात. सरकार या जनरेट्यापुढे झुकते आणि मग आपण या घटनेसंबंधी काही एक कार्य केल्याचे त्या संघटनेला तिच्या कार्यकर्त्यांना आणि त्या नेतृत्वाला समाधान वाटते. ही समाजातून उमटलेली पहिली प्रतिक्रिया असते. पुढील दीर्घकाळासाठी हे नेते, कार्यकर्ते शांत राहिले तरी त्यांच्या आंबेडकरी निष्ठांबाबत शंका घेण्याचे काही कारण नाही.

नांदेडला होणाऱ्या आंबेडकरी विचारवेध परिषदेत प्रख्यात विचारवंत राहुल वानखेडे, दलित पँथरचे नेते आणि सहसंस्थापक ज. वि. पवार, माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्यासह अनेक पँथर सहभागी होत आहेत. एक सशक्त विचारमंथन होणे अपेक्षित आहे. ही परिषद संपन्न झाल्याबरोबर लगेचच पुढील काळात अत्याचार थांबणार आहेत अशी असणारी परिस्थिती नाही. परंतु त्या दिशेने प्रयत्नांची वाटचाल करीत राहणं आवश्यकच आहे. सद्या कुठेही अत्याचाराचे प्रकरण नसले तरी तो आपला ज्वलंत विषय नाही असे मानण्याचे कारण नाही. येणाऱ्या काळात आंबेडकरी लोकांचे तथा तत्सम लोकांचे खून, हाणामाऱ्या, अपमानास्पद वागणूक किंवा दोन समुहात तेढ निर्माण होऊन घडणाऱ्या दंगली हे प्रकार घडणारच आहेत. याचे कारण म्हणजे चातुर्वर्ण्याधिष्ठित मानसिकता हे होय. स्वतःला आपल्या समाजाला श्रेष्ठ मानणारे वर्ण हे कनिष्ठ वर्गाला हीन वागणूक देण्याची, अन्यायाने वागविण्याची, जातीय मुद्यावरुन संघटीत गुन्हेगारीच्या स्वरूपात ठार मारण्याची, घरे जाळण्याची, कुटुंबच उध्वस्त करण्याची, वाळीत टाकण्याची मानसिकता मनुवादी समाजव्यवस्थेतूनच आलेली आणि मेंदूत घर करून बसलेली आहे. दलित शोषित वंचित पीडित समजल्या जाणाऱ्या एखाद्या जात समुहाने एखाद्या सवर्ण स्त्री किंवा पुरुषावर अत्याचार केला आहे किंवा त्यांची नग्न धिंड काढली आहे किंवा अत्यंत अपमानास्पद पशुहीन वागणूक दिली आहे किंवा जिवांशीच ठार मारले आहे असे यापैकी एखादेतरी उदाहरण आपल्याला सापडेल काय ? याचे उत्तर नाही असेच आहे.


आंबेडकरी कार्यकर्ता कुठेही राहत असला, कार्यरत असला तरी कुठेतरी बाबासाहेबांचे, बुद्धाचे विचार अंशतः तरी अंगिकारलेले असतात. त्याला वैचारिक पार्श्वभूमी नसतेच असे नाही. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत तोच महत्वाचा दुवा आहे. आपण काय करतो आहोत, आपण काय बोलतो आहोत, याची त्याला जाणीव असते. तमाम भारतीयांच्याच नव्हे तर सकल मानवसृष्टीच्या कल्याणाची धम्मभूमिका त्याच्या कृतीत उतरते. त्यामुळे त्याला यासाठी कार्य करणे क्रमप्राप्त आहे. सामाजिक विचारधारेच्या परिवर्तनासाठी लोकांमध्ये मूल्यांतर घडवून आणण्यासाठी आणि त्यासाठी वैचारिक मन्वंतर घडवून आणण्यासाठी त्याला जीव ओतून प्रयत्न करावे लागणार आहेत. अशा होणाऱ्या विविध परिषदा त्याच्यासाठी फायदेशीर ठरणाऱ्या आहेत. या परिषदांतूनही विचारवंत - विचारवंत, विचारवंत - कार्यकर्ता, कार्यकर्ता- कार्यकर्ता असा वैचारिक सुसंवाद निर्माण होऊन सकारार्थी बदल घडून येणार आहे. हे इथेच थांबणार नाही. गावागावांत आणि खेड्यापाड्यात जिथे अन्याय अत्याचाराच्या घटना घडत असतात त्यातील अत्याचार करणारे आणि ज्यांच्यावर तो होतो ते असे दोन्ही घटक यात सहभागी होऊन सामाजिक सामंजस्य निर्माण व्हावे आणि सांस्कृतिक मजबुतीकरण व्हावे, कोणतेही गैरसमज नसावेत यासाठी या परिषदेने एका सर्वव्यापी अभियानाचे रुप धारण करावे अशी रास्त अपेक्षा या परिषदेकडून व्यक्त करणे वावगे ठरणार नाही.

प्रज्ञाधर ढवळे,
मो.९८९०२४७९५३

# द्राक्ष उत्पादकांच्या व्यथा अन एका दिवसाच्या विद्यार्थ्यांची कथा

आधुनिक केसरी

**कावडयात्रे संदर्भात माझा प्रसिद्ध झालेल्या गोडवाच्या अनुषंगाने गजानन होळकर नाव असलेल्या एका प्रयोगशील शेतकऱ्यांचा मला कॉल आला. कावडयात्रा आणि भरकटलेली तरुणाई याबाबतचे अनुभव सांगत असतांना नकळतपणे त्याने 3,4 विषयाला ओझरता स्पर्श केला अन मी अंतर्मुख झालो. गजानन होळकर हा लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द या गावचा रहिवासी. तसा तो माझा एका दिवसाचा, नव्हे एका तासिकेचा विद्यार्थी. अन तेव्हापासून तो मला सर म्हणूनच संवाद साधतो. अर्थात वर्षानुवर्षे ना त्याची कधी भेट असते ना त्याच्याशी संवाद.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

जनता विद्यालय अंजनी खुर्द येथे शिक्षक असणारे माझे काका स्व आजाबराव पवार यांचे २१ जुलै १९९७ रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्याने शाळेच्या मैदानातच निधन झाले.

काकांचे निधन झाल्याने तेरवी व इतर विधी झाल्यानंतर काकू, भाऊ सुनील, बहीण मंदा हे सगळे आमच्या मुळगावावरून अंजनीला परत आले. त्यांना अशा दुःखाच्या काळात एकटे सोडणे योग्य नसल्याने बाबानी मला व आईला त्यांच्या सोबत अंजनी ला पाठवले. माझे नुकतेच त्यावेळी पदवी नंतर बीपीएड झालेले होते.

अंजनी गावात फारसा वेळ जात नसल्याने तिथल्या जनता विद्यालयात गेलो.आमच्या ब्रम्हपुरी या गावातील गजानन गिरी हा तिथे इयत्ता १२ वीला शिकत होता. मी सहजच मी एक कविता शिकवू का.. ? असे तेथील शिक्षकांना विचारले.

माझे काकांच त्या शाळेवरच शिक्षक होते, त्यांचेच निधन झाल्याने आम्ही तिथेच होतो आणि माझे बाबा जवळ असलेल्या सुल्ताणपूर येथे श्री शिवाजी विद्यालयात मुख्याध्यापक राहून गेलेले असल्याने व जनता विद्यालयाला माझ्या बाबांच्या प्रयत्नातून इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग मिळालेले असल्याने तत्कालीन मुख्याध्यापक, शिक्षक आमच्या परिवाराला जाणून असल्याने त्यांनी तात्काळ होकार दिला आणि मी प्र के अत्रे यांची 'प्रेमाचा गुलकंद' ही कविता तिथे शिकविली. त्या एका दिवसाच्या एका तासिकेला गजानन होळकर हा एक विद्यार्थी होता.



किशोरवयीन वय आणि त्या कोवळ्या वयात मी त्यांना तिथेच कायमस्वरूपी शिक्षक म्हणून असावे असे त्याला वाटले आणि माझ्या शिकविण्याच्या पद्धतीने तो आणि इतर सर्वच विद्यार्थी प्रभावित झाले होते, अशा पद्धतीने गजानन होळकर सोबत माझा जो ऋणानुबंध निर्माण झाला तो आजतागायत टिकून आहे.

माझ्या कावडयात्रेवरील लेखाबाबत बोलत असतांना मी त्याला त्याच्या द्राक्ष शेतीबाबत विचारले.तो म्हणाला, सर, या श्रावण महिन्यात मी माझ्या बायकोला घेऊन औंढा नागनाथ ला एसटी बस ने जाऊन आलो.

५-१० वर्ष मी द्राक्षाची शेती केली. पण बायकोला साधे तालुक्याच्या ठिकाणी देखील घेऊन जाऊ शकलो नाही, एव्हढेच काय तर जवळच्या नातेवाईकांकडे त्यांच्या सुख दुःखाच्या प्रसंगात हजेरी पण लावू शकलो नाही.

मी आयुष्यभर मजूर पोसत राहलो, औषध विकणार्या व्यापाऱ्यांचे खिसे भरत राहलो.

एक रुपया देखील मागे टाकू शकलो नाही. या शिवाय आम्ही दोघे नवरा बायको स्वतःचे असे आयुष्य देखील मोकळेपणाने जगू शकलो नाही.

आता मस्त सोयाबीन पेरली आहे.या पिकाकडे फारसे लक्ष देण्याची गरज ही नाही अन उत्पन्न देखील चांगले होते. नातेवाईकांच्या सुखदुःखात हजेरी लावतो. कुटुंबाला वेळ देतो...तो हे सगळं सांगत होता अन मी ऐकत होतो.

अगदी सहजच्या औपचारिक गप्पा जरी असल्या तरीही शेतकऱ्याला त्याच्या खासगी आयुष्यात किती तडजोडी कराव्या लागतात. घाम गाळूनही हाती दाम मिळत नाही. आदर्श शेतकरी, द्राक्ष उत्पादक शेतकरी, अशी बिरुदावली नावासमोर लागते खरी मात्र, तो जो पिकवतो त्याला भाव आहे की नाही..? त्याच्या उत्पादनासाठी बाजारपेठ व इतर सोयी सुविधा उपलब्ध नाही की नाही..? याचा विचार ना पुढारी करत ना शासन करत.

शेवटी शेती हा आतबट्याचाच व्यवसाय ,त्याला कर्जमाफी दिली की समाजातील पांढरपेशे शेतकऱ्यांच्या नावाने ओरडत राहतात. आणि मोठ्या मोठ्या उद्योजकांना हजारो कोटी रुपयांची कर माफी,व इतर माध्यमातून केल्या जाणारी मदत कुणाला दिसत नाही.शेतकऱ्यांच्या वाट्याला येणारं दररोजच मरण कुणाला दिसत नाही,हेच या कृषिप्रधान देशाचं दुर्दैव आहे.

**मुफ़्त की कोई चीज बाजार में नहीं मिलती,
किसान के मरने की सुर्खियां अखबार में नहीं मिलती।**

# बाप्पासमोर माणुसकी धर्माचा एक तरी संकल्प करावा



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**सर्वाचा लाडका देव म्हणजेच गणपती बाप्पा होय. एक वर्षापासून बाप्पाच्या येण्याची सर्वाना ओढ लागलेली असते आणि जेव्हा गणपती बाप्पाची जवळ येण्याची तारीख येते तेव्हा आठवड्यापासून घरोघरी, गावागावात, चौकात,चौकात सजावटीला सुरुवात होते. जिकडे, तिकडे आनंद दिसते मनामनात आनंद दिसतो आणि गणेश चतुर्थीच्या दिवशी ढोल, ताशाच्या, टाळ मृदंगाच्या गजरात अनेक वाद्याच्या साह्याने गणपती बाप्पाला आणल्या जाते व बाप्पाची स्थापना केली जाते अनेक प्रकारचे पदार्थ बणवले जातात तसेच अनेक प्रकारचे फळे ठेवली जातात.**

जास्वंदाचे फुले आणि दुर्वा वाहून पूजा, अर्चना सकाळ, संध्याकाळी करून आरती केली जाते एवढे भक्तीमय वातावरण बघायला मिळत असते. तसेच गणपती बाप्पा समोर भजन, कीर्तनाचे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते हि एकता व आपुलकी, माणुसकी सर्वामध्ये दिसत असते खास करून गणपती बाप्पा लहान मुलांना खूप आवडत असते. त्याचे अनेक नाव आहेत, कोणत्याही धार्मिक कार्यात पहिला पूजेचा मान गणपती बाप्पाला दिल्या जाते कारण तो मंगलमूर्ती आहे या विषयी कथा सर्वांना माहीतच असेल या दहा दिवसाच्या गणेश उत्सवात एवढं काही चांगले बघायला मिळत असते की, कधी गणपती बाप्पा जाऊच नये असेच वाटत राहते. ह्याचे खरे कारण



म्हणजेच प्रत्येक माणूस श्रध्दाळू,दयाळू, प्रेमळ दिसते सोबत त्यांच्यात गणपती बाप्पाविषयी जेवढी आपुलकी दिसते तेवढीच आपुलकी, माणुसकी इतरांच्या बाबतीत सुध्दा दिसत असते पण, हे,सर्व दहा दिवस मर्यादित न ठेवता कायम पर्यंत टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

असे जर झाले तर गणपती बाप्पाला सुद्धा खूप आनंद होईल कारण दहा दिवस मोठ्या श्रध्देने, भक्तीने बाप्पाची सेवा, आराधना केली जाते तेवढी पूजा बाप्पा नक्कीच बघत असेल कारण तो ईश्वर आहे समाजाची सेवा, गोर, गरीबांना आधार, रंजल्या, गांजल्यासाठी धावून जाणे व स्वतः मध्ये प्रामाणिकपणा, आपुलकी ठेवून निःस्वार्थ भावनेने कार्य करणारी व्यक्ती बाप्पाला आवडत असते. म्हणून जेवढा विश्वास व श्रध्दा बाप्पावर ठेवली जाते तेवढाच विश्वास स्वतःवर ठेवायला पाहिजे. सोबत चांगले विचार, सत्याचा स्वीकार, मेहनत, स्नेह सर्वाचा आदर हे सर्वच गुण जर प्रत्येक माणसात असतील तर बाप्पाला सुद्धा आनंद होईल कारण ईश्वराला हेच तर हवे असते. माणूस हा माणसासाठीच असतो व जो माणूस, माणुसकी ठेवून आपुलकीच्या नात्याने माणसासाठी पशू, पक्षासाठी, झाडांसाठी जगतो तीच खरी पूजा बाप्पाची असते देव शेवटी भावाचा भुकेला असतो असे आमचे थोर संत सांगून गेले आहेत म्हणून त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालून माणसासारखे जगले पाहिजे. दहा दिवस बाप्पाच्या नामात तल्लीन होऊन आपण सर्व काही विसरून जातो तसच द्वेष, तिरस्कार, निंदा, चुगली, खोटे बोलणे, हिंसा, चोरी, व्यसन, मारामारी, फसवणूक, दिखावूपणा, ढोंगीपणा, भेदभाव, अंधश्रध्दा ह्या सर्व व्यर्थ गोष्टींचा त्याग करण्याचा प्रयत्न करावे व माणुसकी धर्म कायमस्वरूपी टिकवून ठेवण्यासाठी बाप्पा समोर संकल्प करावे जीवन अजून सुंदर होईल आणि पुन्हा त्याच जीवनाला सुंदर बनविण्यासाठी इतरांनाही मानवी जीवनाचे महत्व पटवून द्यावे शेवटी हेही महान कार्य आहेत.

हेच कार्य बाप्पाला ही नक्कीच आवडतील कारण तो ईश्वर आहे त्याला सर्व काही कळत असते. बाप्पाचे गुणगाण करावे, गजर करावा पण, एक संकल्प माणुसकी धर्म टिकवून ठेवण्याचा करावे सर्व चांगलेच बघायला मिळेल.

# मराठवाड्याला दिलासा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृतमहोत्सवानिमित्त संभाजी नगरात राज्य मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीसाठी राज्याचे अख्खे मंत्रिमंडळ मराठवाड्यात अवतरले होते त्यामुळे या बैठकीतून मराठवाड्याला काय मिळेल याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मागील काही वर्षांपासून मराठवाड्यावर निसर्गाने अवकृपा केली आहे कायम दुष्काळाच्या छायेत असणारा हा प्रदेश तसा विकासापासून कोसो दूर आहे. यावर्षी तरी निसर्ग मराठवाड्यावर कृपा करेल अशी आशा मराठवाड्यातील जनतेला होती मात्र यावर्षीही निसर्गाने मराठवाड्याकडे पाठच फिरवली. तशी यावर्षी संपूर्ण राज्यालाच पावसाने हुलकावणी दिली आहे मात्र मराठवड्याकडे तर पावसाने पाठच फिरवली आहे.**

अख्खा पावसाळा कोरडा गेल्याने मराठवाड्यातील शेतकरी हतबल झाले आहेत. पुरेसा पाऊस न झाल्याने यावर्षी मराठवाड्यातील धरण साठ्यात अवघे ३२ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. हा पाणी साठा आणखी काही महिने पुरु शकतो त्यानंतर पिण्यासाठी दाही दिशा अशीच मराठवाड्याची अवस्था होईल. यावर्षी संपूर्ण राज्यावरच दुष्काळाचे सावट आहे मात्र मराठवाड्यात ते अधिक गडद आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या या बैठकीकडे संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागून होते. या बैठकीत किमान मराठवाड्यात तरी दुष्काळ जाहीर होईल अशी अपेक्षा मराठवाड्यातील जनतेला होती मात्र सरकारने दुष्काळ जाहीर न करता मराठवाड्यासाठी ४६ हजार कोटींहून अधिक रुपयांचे पॅकेज जाहीर



करून मराठवाड्यातील नजनतेला दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारने जलसंपदा, सार्वजनिक बंधकाम, नियोजन, ग्रामविकास, कृषी, पशुसंवर्धन, क्रीडा आदी विभागांसाठी हे पॅकेज जाहिर केले आहे. अर्थात ७५ वर्षांच्या विकासाचा अनुशेष या पॅकेजने पूर्ण होणार नसला तरी या पॅकेजची प्रभावी अंमलबजावणी झाली तर मराठवाड्याचा अनुशेष काही प्रमाणात तरी भरून निघेल. मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी सरकारने उचललेले हे सकारात्मक पाऊल आहे त्यामुळेच त्याचे स्वागत व्हायला हवे. अर्थात असे पॅकेज सात वर्षांपूर्वी देखील जाहीर झाले होते. २०१६ साली देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठवड्यातच मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती तेंव्हा देखील असेच हजारो कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. त्याचे पुढे काय झाले हा प्रश्न गुलदस्त्यातच आहे. अर्थात त्यानंतर राज्यात अनेक नैसर्गिक आणि राजकीय घडामोडी घडल्या. कोविडमुळे जवळपास तीन वर्ष वाया गेली. सरकारे आली आणि गेली त्यामुळे पॅकेजच्या अंमलबजावणीस अडचणी आल्या असतील आता मात्र सरकारने जाहीर केलेल्या या पॅकेजची प्रभावी अंमलबजावणी करावी म्हणजे मराठवाडयातील जनतेला त्याचा लाभ होईल. मराठवड्यापुढील मागास हा शब्द नाहीसा करण्यास हे पॅकेज पुरेसे नसले तरी त्याची सुरवात करण्यास मात्र या पॅकेजचा नक्कीच उपयोग होईल म्हणूनच सरकारने याची प्रभावी अंमलबजावणी करावी.



# चंद्रपुरात भाजपाने केला लाभार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे 17 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर या काळात सेवा पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे.17 सप्टेंबर मोदींजींच्या जन्मदिनाचे औचित्य साधून रविवारी भाजपा जनसंपर्क कार्यालयात केक कापून आनंद व्यक्त केला.या प्रसंगी विविध योजनेतील लाभार्थ्यांचा भाजपा जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात राजू दागमवार,दशरथ सोनकुसरे,प्रवीण करमरकर,विशाल इंदूरकर,महेश उसगावकर,कावडुजी क्षीरसागर,करण बोरकुटे,संजय हलधर,ललिता सरकार ,परूल बिश्वास यांचा प्रामुख्याने समावेश या कार्यक्रमाला डॉ मंगेश गुलवाडे सुभाष कासोनगोटूवार रविद्र गुरनूले विठ्ठल डुकरेअंजली घोटेकर विशाल चद्रकल सोयाम निंबाळकर रमेशजी भुते, सूर्यकात कुचनवार रवि जी चहारे , सैयद चांद, रघुवीर अहिर, सगिता ताई खांडेकर, मुगदा खांडे, बाळू कोलनकर, जहीर भाई, विजय उईके,निशिकांत महागावकर दिनकर सोमलकर अजय सरकार जयश्री जुमडे धम्मप्रकाश बसणे महेंद्र जुमडे प्रलय सरकार वर्ष सोमलकर नूतन मेश्राम अंकित यादव ज्योती उगेमोगे सोमनाथ जाधव पंकज, यादव पंकज, विश्वास संदिप आगलावे, दशरथ सोनकुसरे मुकेश गाडगे, पुंडलीक उरकुडे, प्रदिप किरमे, जंगेद्र अडगूलवार, तेजा सिंग, दिवाकर पुदटवार, शांताराम भोयर, रेखा चने, रंजना उमाटे, रामनारायण रविदास, संदिप उरकुडे, रविंद्र काळे राजेंद्र किळे राजेंद्र दागमवार अरून झटे यांची उपस्थिती होती.राहुल पावडे पुढे म्हणाले,सेवा पंधरवडा अभियानात विविध सेवा कार्यक्रम राबविले जाणार आहे. सेवा पंधरवड्यात युवा मोर्चातर्फे रक्तदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.त्याचबरोबर मोदी सरकार आणि राज्य सरकारच्या गोरगरिबांच्या कल्याणासाठीच्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी वस्ती संपर्क अभियान राबविण्यात येणार आहे.त्याचाच भाग म्हणून रविवारी महानगरातील 05 मंडळात 'घर चलो अभियानाची सुरवात करण्यात आली.पावडे पुढे म्हणाले,02 ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त व्यापक प्रमाणात स्वच्छतेचे उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात योगदान दिलेल्या महापुरूषांचे पुतळे तसेच परिसर स्वच्छ करण्याचे कार्यक्रम ही होणार आहेत. आयुष्यमान भव सप्ताहानिमित्त गरजू जनतेकरिता आयुष्मान कार्ड वाटप तसेच नोंदणी कार्यक्रमाचेही आयोजन केले जाणार आहे. या पंधरवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे व्यक्तिमत्व , विकासाची दृष्टी , धोरणे आणि त्यांना मिळालेले यश या विषयावरील प्रदर्शनीही आयोजित केली जाणार आहे,अशी माहिती त्यांनी दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेले 9-वर्षात केंद्र सरकारच्या माध्यमातून अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेक योजना सुरू केल्या. सेवा,सुशासन आणि गरीब कल्याणासाठी वचनबद्ध असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पक्ष संघटनेकडून त्यांचा सेवाभाव विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले.

# कोलगाव व मानोली येथील उर्वरित 374 हेक्टर जमिनींचेही आता अधिग्रहण

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** वेकोलि बल्लारपूर क्षेत्रअंतर्गत असलेल्या धोपटाळा युजी टू ओसी कोळसा खाणीसाठी अधिग्रहण प्रकीयेतून सुटलेल्या कोलगांव व मानोली येथील शेतकऱ्यांच्या उर्वरीत शेतजमिनीचे अधिग्रहण करून कोलगांवचे पुनर्वसन करण्यात यावे, अशी काही वर्षांपासून मागणी करण्यात येत होती. या मागणीची दखल घेत उर्वरित जमिनीचे अधिग्रहण आवश्यक असल्याने राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी पिडीत शेतकऱ्यांच्या रास्त मागणीला घेवून क्षेत्रीय स्तरावर तसेच वेकोलि मुख्यालयाशी पत्रव्यवहार तसेच वेकोलिच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठकांचे आयोजन करून हा महत्वपूर्ण प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे.

कोलगांव येथील बहुतांश जमिनींचे अधिग्रहण झाल्याने व हे गांव पुरप्रभावित असल्याने पावसाळ्यात नदी व नाल्यांना पूर येवून गांव पुराच्या पाण्याने वेढत असल्यामुळे उर्वरित 360 हेक्टरवरील शेती करणे कोलगाववासीय शेतकऱ्यांना कठीण झाले होते. त्यामुळे या उर्वरित जमिनीचे अधिग्रहण करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. हंसराज अहीर यांच्या हस्तक्षेप व पाठपुराव्यामुळे आता कोलगांव व मानोली येथील अनुकमे 360 व 14 हेक्टर शेतजमिनीला सेक्शन-4 लागू केल्यानंतर हा प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहे.

संबंधित प्रकल्पग्रस्तांनी दि. 18 सप्टेंबर रोजी हंसराज अहीर यांच्या निवासस्थानी येवून न्याय मिळवून दिल्याबद्दल त्यांचा शाल, श्रीफळ देवून व मिठाई वाटून कृतज्ञता व्यक्त करीत सन्मान केला. यावेळी कोलगावचे सरपंच पुरूषोत्तम लांडे, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजु घरोटे, मधुकर नरड, ॲड. प्रशांत घरोटे, अक्षय निब्रड, रमेश पाटील लांडे, राजु पिपळकर, विकास दिवसे, प्रशांत मोरे, जगदिश लांडे, संजय किगरे, कु. निब्रड यांच्यासह कोलगांव व मानोली येथील प्रकल्पग्रस्त शेतकरीबांधव उपस्थित होते. कोलगांवच्या पुनर्वसनाबाबत वेकोलि प्रबंधन सकारात्मक कार्यवाही करीत असल्याचे अहीर यांनी उपस्थित प्रकल्पग्रस्तांना यावेळी सांगीतले.



# पोहरी बु. येथे कापूस उत्पादकता वाढ प्रकल्पांतर्गत शेतीशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पोहरी बु येथे राज्य पुरस्कृत कापुस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास प्रकल्प अंतर्गत एम. एन. शिसोदिया तालुका कृषी अधिकारी सोयगाव यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान मंदिर येथे शेतीशाळा वर्गाचे आयोजन करण्यात आले होते.

शेतीशाळा वर्गात शेतकरी बांधवांना कापूस पिकातील प्रमुख किड व त्यावरील उपाय योजना, कापूस वेचताना घ्यावयाची काळजी व योग्य वेळी वेचणी झाली नाही तर कापसाच्या प्रतवारी वर होणारा परिणाम, तसेच कापूस वेचणी पाश्चात व्यवस्थापन व विक्री याविषयी सविस्तर मार्गदर्शन कृषि विज्ञान केंद्र गांधेली, संभाजीनगर येथील विषय विशेषज्ञ तुषार चव्हाण यांचेमार्फत करण्यात आले. तालुक्यात रब्बी पेरणी हंगाम चालू होणार असल्याने रब्बी हंगामात जास्तीत जास्त पौष्टिक तृणधान्य पिकांची पेरणी करावी असे आवाहन संपत वाघ मंडळ कृषि अधिकारी बनोटी यांचे मार्फत करण्यात येत आहे. तसेच पौष्टक तृणधान्यचे मानवी आहारात किती महत्व आहे याविषयी सविस्तर माहिती कृषि सहाय्यक विजय निकुंभ यांनी सांगितली कार्यक्रमास कृषि पर्यवेक्षक प्रदीप पाटील, कृषि सहाय्यक कैलास कुमावत कृषि सहाय्यक भाग्यश्री वायकर व तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा अमोल महाजन तसेच गावचे सरपंच व शेतकरी बांधव उपस्थित होते.



# राजूर येथे वैद्यकीय शिक्षणास पात्र गुणवंतांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील राजूर येथील स्नेहल पारवे आणि गायत्री टाकळकर या विद्यार्थिनींनी 2023मध्ये घेण्यात आलेल्या नीट परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. नुकतीच त्याची निवड यादी जाहीर झाली असून यामध्ये त्या एमबीबीएस वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरल्या आहेत. त्याबद्दल राजूर येथे मित्रपरिवाराच्या वतीने स्नेहल पारवे आणि गायत्री टाकळकर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. भारतातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या नीट या वैद्यकीय प्रवेश परीक्षासाठी देशभरातून लाखो विद्यार्थी बसतात.ही परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सीज म्हणजेच राष्ट्रीय चाचणी एजन्सीद्वारे दरवर्षी घेतली जाते. या परीक्षेत स्नेहल रामकृष्ण पारवे हिस एमबीबीएस साठी रायगड जिल्ह्यातील डॉ.एन. वाय. तासगावकर मेडिकल महाविद्यालयात प्रवेश मिळाला आहे. तर गायत्री लक्ष्मीकांत टाकळकर हिचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथे प्रवेश निश्चित झाला आहे.

स्नेहल पारवे आणि गायत्री टाकळकर या मुलींनी ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन या परीक्षेत यश मिळवले आहे. याही परीक्षेत मुलींनीच बाजी मारल्याचे चित्र दिसून आले. त्यांची वैद्यकीय शिक्षणासाठी निवड झाली म्हणून मित्रपरिवाराच्या वतीने वतीने सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राजुरचे सरपंच प्रतिभा भुजंग, माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, माजी ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब पुंगळे, ज्येष्ठ शिक्षक पिंपळे सर, प्रा.बाळासाहेब बोराडे, हरी निकम, विनोदकुमार पांडे, शिवाजी बांदल डॉ.ईश्वर जटाळे पत्रकार राम पारवे, दीपक पारवे, विष्णू गवळी, संदीप सोनवणे, दिनेश महाराज शेजुळ, लक्ष्मीकांत टाकळकर, राजू भुमकर, अभिषेक टाकळकर, अतुल पुंगळे, अभिषेक पारवे आदीजन उपस्थित होते.

# अभाविपच्या कृतज्ञता यात्रेचे रत्नपूर नगरीत स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद देवगिरी प्रदेश आयोजित मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कृतज्ञता रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेचे रत्नपुर शहरात स्वागत करण्यात आले यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे,शहराध्यक्ष सतीश दांडेकर, संभाजीनगर ग्रामीण जिल्हा संघटनमंत्री व कृतज्ञता रथयात्रा प्रांत व्यवस्था प्रमुख ओमकार गुंतापल्ले रेड्डी, जीवन वाघ, गणेश जोशी, मा.उपसभापती दिनेश अंभोरे, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक परसराम बारगळ, अविनाश कुलकर्णी, योगेश बारगळ, भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष संदीप निकम, दिनेश कायस्थ, गणेश सावजी, बंडू शिंदे, सोमनाथ तुरेवाले यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# मुस्लिम बांधवांना मारहाण; जळगाव महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**फूलंब्री :** शहरात काल दि. 18 सप्टेंबर रोजी औरंगाबाद जळगाव महामार्गावरील टी पॉइंटवर गाव पूसेसावळी तालुका खटाव सातारा जिल्हा येथे मुस्लिम समाजाच्या पुरूषांना मारहाण करण्यात आली या घटनेचा निषेध व्यक्त करत औरंगाबाद जळगाव महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आला. यावेळी सत्ताधारी भारतीय जनता पार्टी,शिंदे सेना अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉँग्रेस च्या विरोधात घोषणा देण्यात आल्या.

तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तर दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुसेसावळी तालुका खटाव जिल्हा सातारा या ठिकाणी जातीय तणावातुन दंगल घडवून आणली. यात कायदा हातात घेऊन मुस्लिम समाजाच्या घरे दुकाने व प्रार्थना स्थळ मस्जिद तोडण्यात आली व काही समाजकंटकांनी कायदा हातात घेऊन गोरगरीब असलेल्या मुस्लिम समाजाच्या पुरुषांना मारहाण केली.यात एका नुरुल हसन खान या तरुणाचा मृत्यू झाला. तसेच दोन तरुण गंभीर जखमी झाले व 25 ते 30 तरुणांना गंभीर मार लागला.

अशात मुत्यु झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबाला 50 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, ज्यांना गंभीर मार लागला आहे



त्यांना 10 लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी . पाडण्यात आलेल्या मस्जिद ची ताबडतोब जसे तशीच बनवून देण्यात यावी. महाराष्ट्र राज्य हे शांततीय प्रदेश आहे या प्रदेशात सर्व धर्मीय लोक गुण्यागोविंदाने राहतात परंतु काही समाजकंटक यामध्ये जातीय तेढ निर्माण करून दंगल घडवून आणत आहे. सातारा जिल्ह्यातील पूसेसावळी या गावात मुस्लिम समाज बांधव शांततेत राहत होते परंतु दंगलखोरांनी दंगल केली. निष्पाप लोकांचा बळी गेला. या घटनेची उच्च स्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी फुलंब्री तालुका समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली. या औरंगाबाद जिल्ह्यासह तालुक्यातील मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यावर दुष्काळाचे सावट

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्यातील ३६ पैकी १३ जिल्ह्यांत दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाली आहे. १३ जिल्ह्यांत एक जून ते १८ सप्टेंबर या काळात पडणाऱ्या सरासरी पावसात २० टक्क्यांहून जास्त तूट आली आहे. नगर, सांगली, सातारा, जालना, बीडमध्ये पडणाऱ्या पावसात ४० टक्क्यांहून जास्त तूट निर्माण झाल्यामुळे टंचाईच्या झळा तीव्र झाल्या आहेत. त्यामुळे तातडीने दुष्काळी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. राज्यात एक जून ते १८ सप्टेंबरपर्यंतच्या कालावधीचा विचार करता सरासरीपेक्षा नऊ टक्के कमी पाऊस पडला. या काळात सरासरी ९२७.९ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ८४५.४ मिमी पाऊस झाला आहे. नगर, सांगली जिल्ह्यांत सरासरीच्या ४५ टक्के कमी, साताऱ्यात सरासरीच्या ४० टक्के कमी, छत्रपती संभाजीनगरमध्ये सरासरीच्या २७ टक्के कमी, जालन्यात सरासरीच्या ४३ टक्के कमी, नांदेडमध्ये सरासरीच्या १९ टक्के कमी, अमरावती सरासरीच्या ३० टक्के कमी, वाशिममध्ये सरासरीच्या २२ टक्के कमी, सोलापुरात सरासरीच्या ३५ टक्के कमी, बीडमध्ये सरासरीच्या ४३ टक्के कमी, धाराशिवमध्ये सरासरीच्या ३२ टक्के कमी, परभणीत सरासरीच्या ३१ टक्के कमी आणि अकोल्यात सरासरीच्या २९ टक्के कमी पाऊस झाला आहे. विदर्भात सरासरीपेक्षा सात टक्के कमी पाऊस झाला आहे. सरासरी ८९४.१ मिमी पाऊस अपेक्षित असताना, ८२७.४ मिमी पाऊस झाला. मराठवाड्यात सरासरीपेक्षा २२ टक्के कमी पाऊस झाला आहे. ५७९.३ मिमी सरासरी पाऊस पडतो. प्रत्यक्षात ४५२ मिमी पाऊस झाला आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा १९ टक्के कमी पाऊस पडला आहे. सरासरी ६७७.४ मिमी पाऊस पडतो, प्रत्यक्षात ५४६ मिमी पाऊस झाला आहे. कोकणात सरासरीपेक्षा सहा टक्के जास्त पाऊस पडला असला, तरीही रत्नागिरीत सरासरीपेक्षा पाच आणि मुंबई शहरात आठ टक्के कमी पाऊस पडला आहे.

# ज्ञानकुंज महाविद्यालयामध्ये मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल बाजार सावंगी यांच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने महाविद्यालय मध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये 2/09/23 ला मराठवाडा मुक्ती संग्राम स्वातंत्र्यलढा या विषयावर विद्यार्थ्यांचे वाचन घेण्यात आले. व्यसन मुक्ती बाबत जनजागृती पर शपथे चे आयोजन केले, व मराठवाडा मुक्ती संग्राम विषयावर रांगोळी स्पर्धा घेण्यात आली, तसेच चित्रकला, प्रभात फेरी, तसेच शाळा स्वच्छता कार्यक्रम राबवण्यात आला असे विविध जनजागृती चे कार्यक्रम ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी यांच्या वतीने राबविण्यात आले.17 सप्टेंबर 2023 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सव निमित्त आपल्या महाविद्यालयामध्ये सकाळी 8.00 वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम करन्यात आला त्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले राधाकृष्ण पाटील जाधव व मंदाताई पाटील जाधव व सार्थक पाटील द्वारकुंडे, माजी मुख्याध्यापक श्रीधर पाटील सर व चेअरमन शरद निकम पाटील, पुंजाजी अण्णा नलावडे हे उपस्थित होते त्याप्रसंगी राधाकृष्ण पाटील जाधव व पुंजा अण्णा नलावडे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले व ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकरणी सदस्य मंदाताई पाटील जाधव यांच्या हस्ते श्रीफळ फोडण्यात आले व यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला. त्यानंतर सामूहिक प्रतिज्ञा घेण्यात आली व ज्या विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त स्पर्धेमध्ये प्रथम प्राविण्य मिळवले त्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. मुक्ती संग्राम दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रांजल साळुंखे ,पायल आघाडे या विद्यार्थिनींनी केले तर प्रस्ताविका वैष्णवी डापके या विद्यार्थिनी केले. आभार प्रदर्शन साक्षी नलावडे या विद्यार्थिनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे,श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण,अविनाश गाडेकर,योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील, राहुल गायकवाड, भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम, चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव, धुमाळ बाबा, यांची उपस्थिती होती.





# आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या उपस्थितीत विकास कामांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वरोरा :** विधानसभा क्षेत्रातील समस्यांवर चर्चा करण्यासाठी आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या उपस्थितीत उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या कार्यालयात बैठक पार पडली. या बैठकीत वरोरा शहरातील कासमपंजा नाल्यातील पाणी वेकोलीच्या नविन प्रस्तावित रोडमुळे निघण्यास अडथळा होत असल्याने पर्यायी व्यवस्था करणे, वरोरा शहराच्या मध्यभागी असलेला गांधी तलाव नगर परिषदला हस्तांतरीत करणे, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना मंजुर करणे आणि वरोरा शहरातील सर्व प्रभागातील विकास कामांचा आढावा या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीत आमदार धानोरकर यांनी वरोरा विधानसभा क्षेत्रातील समस्यांवर लक्ष केंद्रित केले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना या समस्यांचे त्वरित निराकरण करण्याचे निर्देश दिले. बैठकीत उपस्थित उपविभागीय अधिकारी वरोरा यांनी आमदार धानोरकर यांच्या सूचनांचे पालन करण्याचे आश्वासन दिले. उपविभागीय अधिकारी वरोरा शिवनंदा लंगडापुरे, तहसीलदार योगेश कौटकर, मुख्याधिकारी न. प.वरोरा भोयर, माजी गटनेता न. प. गजाननजी मेश्राम, माजी नगर सेवक राजेंद्र महाजन, माजी नगर सेवक छोटुभाऊ शेख, माजी उपाध्यक्ष न. प. अनिल झोटिंग, शुभम चीमुरकर, शशी चौधरी, प्रतिमा जोगी, प्रमोद काळे, राहुल देवडे, हितेश भालेराव, प्रवीण सुराणा, धनवलकर, विजय पुरी, राजू बनसोड, शैलेश पद्मगिरवार, न. प. विभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती. बैठकीत ठरल्यानुसार कासमपंजा नाल्यातील पाणी वेकोलीच्या नविन प्रस्तावित रोडमुळे निघण्यास अडथळा होत असल्याने पर्यायी व्यवस्था करण्याचे काम तातडीने सुरू केले जाईल. नगर शहराच्या मध्यभागी असलेला गांधी तलाव नगर परिषदला हस्तांतरित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यासाठी संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. वरोरा शहरातील सर्व प्रभागातील विकास कामांचा आढावा घेऊन त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. या निर्णयामुळे वरोरा शहरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अवैध धंदेमुक्त कृती समिती अध्यक्षपदी संदीप इंगळे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** आमखेडा- व गलवाडा येथील सूज्ञ नागरिकांची जिल्हा परिषद बांधकाम विश्रामगृहात जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शेख गुलाब यांच्या अध्यक्ष तेखाली रविवारी (दी.१७) बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्वानुमते अवैद्य धंदे मुक्त कृती समितीचे गठन करण्यात आले. यावेळी सोयगाव शहर, आमखेडा व गलवाडा परिसरात सुरू असलेले कल्याण -मुंबई वरळी मटका, पत्त्यांचे तिरर्ट खेळ, ऑन लाईन मटका व विनापरवाना शासनाचा कर बुडवून विक्री होणारी अवैद्य देशी दारू हे अवैध धंदे बंद करण्यासाठी ठराव घेण्यात आला. यासाठी सोयगाव अवैद्य धंदे मुक्त कृती समितीची ।निवड करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी संदीप इंगळे, कार्याध्यक्षपदी विजय काळे, तर सचिवपदी सुनील काळे यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच उर्वरित कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी भारत पगारे, सहसचिव-एकनाथ पाटील गोंड, रवींद्र काटोले, पूनम परदेशी, सहसंघटक -दत्तू काटोले, ईश्वर इंगळे, सल्लागार - विजय पगारे,दिलीप शिंदे, रामा एलिस, राजू दुतोंडे, शेख गुलाब, कार्यकारणी सद्स्य -शेख सुलेमान यासिन बेग, मुश्ताक शहा, आदींची निवड करण्यात आली. सोयगाव शहर, आमखेडा व गलवाडा परिसरात सुरू असलेले कल्याण -मुंबई वरळी मटका, पत्त्यांचे तिरर्ट खेळ, ऑन लाईन मटका व विनापरवाना शासनाचा कर बुडवून विक्री होणारी अवैद्य देशी दारू हे अवैध धंदे बंद करण्यासाठी समिती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक, ग्रामीण पोलीस अधीक्षक व सिल्लोड उपविभागीय पोलीस अधिकारी यांना भेटून निवेदन देण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

# शेतकऱ्यांच्या समस्या सोडवा : प्रदेशाध्यक्ष विठ्ठलराव पवार

## जालना जिल्हाधिकाऱ्यांना शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेने दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य चे प्रदेशाध्यक्ष श्री विठ्ठलराव पवार राजे त्यांच्यासोबत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ जाधव नगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व मराठवाडा विभागाचे सचिव व सभासद जालना जिल्हा येथे रस्ता रोको करून शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य तो भाव देणे द्यावा तसेच विज बिल थकल्यास त्याचे कनेक्शन कट करू नये पाऊस नसल्यामुळे शेतकऱ्याला पिक विमा घोषित करून पिक विम्याची रक्कम त्वरित देण्यात यावी सोयाबीनला व मक्का ला जास्त भाव देणे ऊसाला तसेच कांद्याची व मकाची



निर्यात करावी याबाबत जालन्याचे जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन देताना सोबत शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रदेश अध्यक्ष श्री विठ्ठल पवार राजे व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष श्री काशिनाथ जाधव जालना जिल्ह्याचे अध्यक्ष नगर जिल्ह्याचे अध्यक्ष तसेच जिल्हा कोषाध्यक्ष श्री देवराव आहेर व संघटना कार्याध्यक्ष श्री पंडितराव खरात व सर्वश्री हिम्मतराव पाटील जाधव कारभारी पाटील जाधव बाबुराव पाटील जाधव नाना पाटील सोटम व इतर संभाजीनगर येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

# वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची चर्चा निष्फळ

## मागण्या पूर्ण होईपर्यंत उपोषण सुरू राहणार : रवींद्र टोंगे, राष्ट्रीय ओबीसी विद्यार्थी महासंघ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्यात सुरू असलेल्या ओबीसी विरुद्ध मराठा संघर्षांने आता कळस गाठला असून एकीकडे जरांगे पाटील तर दुसरीकडे टोंगे असे आंदोलन रंगले आहे.

ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी मराठा समाजाने केली तर दुसरीकडे मराठा समाजाच्या या मागणीला ओबीसी समाजाने तीव्र आक्षेप नोंदविला आहे. मराठा समाजाच्या मागणीविरोधात राज्यभरात व चंद्रपुरात ओबीसी महासंघाचे विद्यार्थी जिल्हाध्यक्ष रविंद्र टोंगे हे 11 सप्टेंबर पासून आमरण उपोषणाला बसले आहे, आज आठवडा लोटल्यावर राज्याचे वनमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी उपोषणस्थळी भेट दिली मुनगंटीवार यांनी आंदोलकांच्या मागण्या जाणून घेत त्यांच्या मागण्यासंदर्भात मंत्रिमंडळात चर्चा करीत बैठक लावू, असे आश्वासन आंदोलकांना दिले.

ओबीसी समाजाच्या मागणीनुसार राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृहाबाबत जी घोषणा झाली त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, जातनिहाय सर्वे करावे, स्वाधार योजना लागू करावी अश्या विविध मागण्या घेऊन टोंगे यांनी आमरण उपोषणाला बसले आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी आंदोलकांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली, वस्तीगृहाबाबत चंद्रपुरात वसतिगृह सूरु करू व स्वाधार योजनेचा लाभ इतर ओबीसी विद्यार्थ्यांना देणार असे आश्वस्त केले मात्र आंदोलकांनी मुनगंटीवार यांना हा प्रश्न जिल्ह्याचा नसून राज्याचा आहे, वस्तीगृह चंद्रपूर सहित राज्यात सुरू करावे असे आंदोलकांनी म्हटले सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी आंदोलकांसोबत बहुजन कल्याण मंत्री




अतुल सावे यांच्याशी दूरध्वनी द्वारे संवाद साधून दिला. चंद्रपुरात वस्तीगृह सुरू करावे याबाबत तात्काळ काम सुरू करण्यात येतील असे सावे यांनी आश्वाशीत केले मात्र आंदोलकांनी सरळ सांगितले की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री व प्रशासकीय अधिकारी यांच्याशी ओबीसी नेत्यांसोबत बैठक लावून आमच्या मागणीवर चर्चा करावी, चर्चेतून काही निष्पन्न झाले तर ठीक अन्यथा आम्ही आंदोलन मागे घेणार नाही जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला अर्धे मंत्रिमंडळ गेले, उपोषण सोडविण्याआधी त्यांना सरकारने काय आश्वासन दिले हे अजूनही बाहेर आले नाही, मात्र आमच्या आंदोलनाकडे सरकारने पाठ फिरवली असे चित्र सध्या दिसत आहे, आमच्या मागणीवर सकारात्मक चर्चा करीत ओबीसी शिष्टमंडळाला शासनाने आश्वाशीत करावे अन्यथा आमचे आंदोलन सुरू राहणार असे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी सांगितले.



# एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय पोषणमाह कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी :** केंद्र सरकार १ ते ३० सप्टेंबर ह्या महिनाभर राष्ट्रीय पोषण माह साजरा करण्यात येतो. गर्भधारणा, बाल्यावस्था, बालपण आणि पौगंडावस्था या मानवी जीवनातल्या गंभीर टप्प्यांबद्दल व्यापक जागरूकता निर्माण करणं हा पोषणमाहचा उद्देश आहे. या कार्यक्रमात विशेष स्तनपान आणि पूरक आहार यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर लक्ष केंद्रित केलं जाते. "सुपोषित भारत, साक्षर भारत, सशक्त भारत" याद्वारे संपूर्ण भारतभर पोषण जागरूकता वाढवणं हा या उत्सवाचा उद्देश आहे.

एकात्मिक बाल विकास प्रकल्प सेवा योजना प्रकल्प, खेड, फुरुस बीटचा पोषण माह कार्यक्रम जिल्हा परिषद शाळा, मौजे दस्तुरी येथे आयोजित करण्यात आला. सदर पोषण माह कार्यक्रमात महिलांनी सकस व पोषण आहाराच्या विविध पाककृतींचे प्रदर्शन,पोषण कट्टा CBE कार्यक्रम, नाविन्यपूर्ण उपक्रमांचा सेल्फी पॉईंट, आजी आजोबा सत्कार व तसेच पोषण आहार ह्या विषयी रांगोळ्या काढून जनजागृती करण्यात आली. लायन्स क्लब मार्फत किशोरवयीन मुलींना सॅनिटरी पॅड वाटप करून हिमोग्लोबिन व शुगर तपासणी करण्यात आली.

उपस्थितांना बालविकास प्रकल्प अधिकारी  यांनी पोषण ह्या विषयी मार्गदर्शन केले आणि कार्यक्रमाचा उद्देश व महत्व सांगून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रकल्पाच्या सर्व अंगणवाडी सेविका, मदतनीस व मोठया प्रमाणावर महिला व पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती फुरुस बीट पर्यवेक्षिका श्रीमती देवता काटकर यांनी केले.

कार्यक्रमासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी श्रीमती दीपाली शिरीषकर, बिट पर्यवेक्षिका श्रीमती. देवता काटकर, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री. पांडुरंग चव्हाण सर, मोरे सर, शाळा व्यवस्थापन समितीच्या वैशाली चव्हाण, लायन्स क्लबचे रोहन विचारे, डॉ. विक्रांत पाटील, रॉयल हॉस्पिटलचे डॉ. अमर भोसले, डॉ. सुरेश चिकणे, प्राथमिक आरोग्य केंद्र फुरुसचे डॉ. धनश्री वाडकर, डॉ. शीतल चाळके, बालविकास प्रकल्प खेडच्या पर्यवेक्षिका श्रीमती. निर्मल बारगोडे, श्रीमती सुजाता म्हातले, सावंत मॅडम तसेच ब्रम्हाकुमारी गीता मॅडम व स्वरूप मॅडम ,ग्रामस्थ, विविध बचत गटातील महिला, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

# वर्तमानपत्र विक्रेते संघटनेचा धडक मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** क्रांति चौक ते पुलिस आयुक्त कार्यालयापर्यंत राज्य मंत्री मंडळावर श्रमिक वर्तमानपत्र विक्रेते संघटना महाराष्ट्र राज्य छत्रपति संभाजी नगर यांचा धडक मोर्चा ' स्वातंत्र कल्याणकारी मंडल स्थापना करने बाबत विक्रेताना जीवन बीमा 'पिवळे रॉशन कार्ड ' E S I कार्ड , मुलाना शिक्षक मोफत देण्यात यावे ' व स्कॉलरशिप देण्यात यावी 'विधवा महिलाना आर्थिक मदद पेंशन चालू करने ' व पन्नास वर्षवरील विक्रेता पेंशन लागू करावी 'कमी दरा ने कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे ' अशा मागण्याचे निवेदन राज्य मंत्री मंडळ ' व मुख्य मंत्र्याच्याकडे देव्यात आले. संस्थापक प्रकाश वाघ अध्यक्ष- विष्णू कावळे, सचिव -शिवाजी ढेपले, कोषाध्यक्ष- राजू गायकवाड, उपाध्यक्ष- विठ्ठल पारटकर, कार्याध्यक्ष-रामकृष्ण राऊत,  प्रसिद्धीप्रमुख- गजानन बर्गे, पुंडलिक भोसले, बापू भोसले, मनोज बुऱ्हाडे, दिलीप जगताप, 'गणेश निकम, किशोर लहाने, जगदीश कुंटे, अनिल बर्गे, तीर्थराज कुरे, संजय किनोळे, नितीन दहाड, पप्पू पवार, गोपीनाथ माळी, संदीप देवरे, अवधूत भोयर,सुनील शेट्टी, संतोष जटाळे, बबन लहाने, श्रीकृष्ण काळे,भागवत बोडके, बळीराम काकडे, सिद्धेश्वर खंदारे, गणेश बुरकल, सागर निकाळजे, सिद्धार्थ गजमल, गणपत रेनगडे, दत्ता गजमल, भीमाशंकर सर्जेराव, वसंत पंडित, सत्यनारायण मिरकड, कुलभूषण वाहूके, ज्ञानेश्वर संभेरव्, संजय किन्हाळे, माणिक कदम, सुरेश गाजरे, नारायण आहेर, संजय सोनवणे, राम मिसाळ आदी उपस्थित होते.



# अतिक्रमण प्रकरणात जिल्हाधिकारी यांचा आदेश आयुक्तांनी केला रद्द

## कणसे यांच्या अतिक्रमणाची फेरचौकशी करावी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील मक्रणपुर येथील ग्रामपंचायत सदस्य सिंदुबाई सुपडु कणसे यांनी गावातील मिळकत नंबर चार वर व सरकारी जागेवर अतिक्रमण केलेले प्रकरणी

विस्तार अधिकारी यांनी मोजणी न करता केवळ पाहणी आधारे अहवाल तयार केलेला आहे .या प्रकरणी कोणतIही पंचनामा अहवाल नसल्याने अपर विभागीय आयुक्तांनी अर्ज फेटाळला असुन फेरचौकशीचा आदेश दिले आहे.

मक्रणपुर गावातील ग्रामपंचायत सदस्य सिंदुबाई सुपडु कणसे यांच्या पतीने सरकारी जागेवर अतिक्रमण केले आहे म्हणुन तक्रारदार पोपट खंडु लोंढे यांनी जिल्हाअधिकारी यांच्या कडे सदस्य पद रद्द करण्यासाठी तक्रार दाखल केली होती मात्र विस्तार अधिकारी कन्नड पंचायत समिती यांनी जिल्हाअधिकारी यांना अहवाल दिला होता परंतु विस्तार अधिकारी यांनी मोजणी न करता केवळ पाहणी करून थातुर मातुर अहवाल तयार करून दाखल केला .



गावातील सिंदुबाई कणसे यांचे पती सुपडु कणसे यांनी सरकारी जागेवर अतिक्रमण केले आहे यांचे न्यायालयाचे पुरावे जोडले आहे मात्र पंचाय समिती विस्तार अधिकारी यांनी थातुर मातुर अहवाल दिल्याने जिल्हा अधिकारी यांनी माझ्या विरोधात निकाल दिल्याने मी अपर विभागीय आयुक्तांन कडे दाद मागीतली त्यांनी जिल्हाअधिकारी यांचा आदेश रद्द करून स्पष्ट फेर चौकशीचे आदेश दिले आहे . **पोपट लोंढे**

या प्रकरणी कोणतIही पंचनामा अहवाल नसल्याने संबधीत मंडळ अधिकारी व विस्तार अधिकारी यांच्या मार्फत संयुक्तपणे जागेवर घराची मोजमापे त्यासंबधीचा पंचनामा नमुना नं .आठ इत्यादी बाबीची तपासनी करून तसेच दिवाणी न्यायालयाचे आदेश यांचा विचार करावा म्हणुन जिल्हाअधिकारी यांचा 10/3/2023 चा आदेश रद्द करून फेर चौकशी करून अहवाल सादर करावा असे आदेश अपर विभागीय आयुक्त यांनी दिले .

# पाळज गणेश महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तेलंगणा सीमेवरील पाळज (ता.भोकर) येथील गणेश स्थापणेस यंदा ७६ वर्ष पूर्ण होत असल्याने या निमित्ताने मंगळवार (ता. १९) ते गूरूवारी (ता. २८) दरम्यान मंडळाच्या वतीने आठवडाभर नियमित सांस्कृतिक, कीर्तन, गीतगायन, भोजनदान असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पाळज येथील गणेशमूर्तीची स्थापणा १९४८ साली करण्यात आली आहे. स्थापनेपूर्वी गावात पटकी रोगाच्या साथीने अनेकांचा बळी गेला आहे.ग्रामस्थानी निर्मल येथील कारागीरा कडुन लाकडाची गणेश मूर्ती बनवून स्थापणा केली आणि पटकी रोगांपासून मुक्ती मिळाली. त्यामुळे तेथील गणेश भक्तांनी जर आपण मूर्ती विसर्जन केली तर पून्हा संकट येईल या भीतीने  मूर्ती विसर्जन करायचे नाही असा ठाम निर्णय घेतला ती पंरपरा आज पर्यंत कायम आहे. एका छोट्या गणेश मूर्तीचे विसर्जन केले जाते.  नवसाला पावणारा संकटमोचक गणेश म्हणून तेलंगणा,आंध्रप्रदेश, विदर्भ, मराठवाडा, कर्नाटक, राज्यातील भक्तगणाची दर्शनासाठी रांग लागते.माजी मूख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार प्रताप पाटील चिखलीकर, यांनी तिर्थक्षेत्र  दर्जा  देण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले आहे. कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर करून विकासकामे मार्गी लावले आहेत.

स्थापणेला ७६ वर्ष पूर्ण होत असल्याने यावर्षी  मंडळानी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. बूधवारी ( ता. २०) रात्री आठ वाजता बाबुराव पाटील भोकर, निर्मित "स्वरानंद" आर्केस्टा, संकल्पना  पत्रकार बी.आर.पांचाळ आणि सोबत सिनेस्टार जूनीअर जानीलीव्हर याचा मिमिक्री व विनोदचा कार्यक्रम,  गूरूवारी ( ता. २१) रात्री आठ वाजता सोनाली करपे याचे कीर्तन, शूक्रवारी ( ता. २२) रात्री आठ वाजता आष्टा गंगाधर यांचा म्यूझीकल नाईट, निझामाबाद (तेलगू आर्केस्टा), शनिवारी (ता २३) रात्री आठ वाजता जानू लिरी( हैद्राबाद )याचा तेलगु आर्केस्टा, रविवारी (ता.२४) रात्री आठ



वाजता रूपालीताई सवने (परतूरकर) यांचे कीर्तन, सोमवारी (ता. २५) सोपान महराज सानप याचं कीर्तन, मंगळवारी ( ता. २६) रात्री आठ वाजता पूरूषोतम महाराज यांच कीर्तन, बूधवारी (ता.२७) रात्री आठ वाजता  "स्वरनिनाद" संगीत संच , नांदेड  यांचा कार्यक्रम,गूरूवारी (ता .२८) महाप्रसाद व श्री विसर्जन मिरवणूकीने सांगता होणार आहे. दररोज रात्री ८ ते ९ वाजे दरम्यान महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. पंचक्रोशीतील गणेश भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन गणेश महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# मराठवाडा मुक्तिसंग्रामात डॉ. आंबेडकरांचे योगदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** "मराठवाडा मुक्ती संग्रामात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनेक पातळ्यावर महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांनी सुचवलेल्या मुत्सदी उपायांमुळे हैद्राबाद संस्थान भारतात विलीन होण्याचा मार्ग मोकळा झाला, असे प्रतिपादन प्रा. डॉ. सुधाकर नवसागर यांनी केले. मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सिद्धार्थ महाविद्यालयाच्या वतीने (शनिवार, दिनांक १६ सप्टेंबर) आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे, प्रा. सुनील मगरे यांची उपस्थिती होती.

प्रा. डॉ. नवसागर पुढे म्हणाले,"डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या शेडूल्ड कास्ट फेडरेशनने निजामाला आणि त्याच्या निजामशाहीला स्पष्ट विरोध दर्शविला होता.या लढाईमध्ये अनेक दलित स्वातंत्र्य सेनानी यांचे हुतात्मा झाले. मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची इतिहासात दखल घेतली नाही. प्रा. सुनील मगरे यांनी प्रस्ताविकात मराठवाडा मुक्ती संग्रामाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे यांनी भारताचे कायदामंत्री डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात मुत्सद्दीपणे भूमिका पार पाडली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुकेशनी जाधव यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विनोद अंभोरे, प्रा. सूरज परघरमोर, निकिता तुपे, अनिता काकरवाल, राम जाधव, मोईन तडवी, आसित शेगावकर, श्रीकांत पातोडे यांनी परिश्रम घेतले.

# प्रीतम म्हात्रे यांचा 'सेवाश्री' पुरस्काराने गौरव

आधुनिक केसरी न्यूज



**पनवेल :** विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा व सेवाभावी संस्थांचा रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंटरच्या वतीने 'सेवाश्री' पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांना रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंटरच्या वतीने 'सेवाश्री' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.
रायगड जिल्ह्यातील इर्शाळवाडी दुर्घटनेनंतर तेथे प्रत्यक्ष भेट देऊन प्रितम म्हात्रे यांनी सर्व प्रथम दुर्घटनाग्रस्त भागाची पाहणी केली. मृतांच्या नातेवाईकांची भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.त्यानंतर त्यांनी त्यांच्या जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या नढाळ येथील श्री. क्षेत्र पंचायतन मंदिरामधून युद्ध पातळीवर एन.डी.आर.एफ टीम, प्रशासन, पोलीस, सामाजिक संस्था तसेच स्थानिक नागरिक यांच्याकडून बचाव व मदत कार्य सुरु होते,त्या ठिकाणी ते स्वतः जातीने उभे होते.
त्यावेळी अडचणीच्या काळात इर्शाळवाडी ग्रामस्थांना मंदिर परिसरात तात्पुरती व्यवस्था करण्यात आली.यावेळी प्रितम म्हात्रे यांनी व त्यांच्या संपूर्ण टीमने प्रशासनाला मदत कार्यात आवश्यक ती मदत त्यांनी केली. मदत कार्य करणारे जिल्हाधिकारी कार्यालया, एन.डी. आर.एफ टीम, पोलीस प्रशासन,प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय, महापालिका प्रशासन व इतर शासकीय यंत्रणा मधील अधिकारी,कर्मचारी यांची सुद्धा अन्नसेवा व राहण्याची व्यवस्था पनवेलचे मा.नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रीतम म्हात्रे यांनी केली.
तसेच मदत कार्य करणाऱ्या सेवकांना कुठलीही मदतीची आवश्यकता असेल तर त्यांनी स्वतःच्या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावे असे आवाहन केले.दुर्घटनाग्रस्त आदिवासी समाज जेव्हा मंदिरामध्ये वास्तव्यास होता.त्यावेळी प्रितम म्हात्रे यांनी त्यांचे संपूर्ण पालकत्व म्हणून जबाबदारी स्वीकारली. सामाजिक दायित्व कार्याची दखल घेऊन जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम जनार्दन म्हात्रे यांचा रोटरी क्लब पनवेल सेंट्रल तर्फे "सेवाश्री" पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.
यावेळी माजी प्रांतपाल डॉ.गिरीश गुणे साहेब, रो.संजीवनी गुणे मॅडम,अध्यक्ष रो.रतन खरोल, सचिव रो.अनिल खांडेकर, शेकाप पनवेल म.न.पा चिटणीस रो.गणेश कडू, माजी अध्यक्ष रो.लक्ष्मण पाटील, रो.ठकेकर सर, रो.संतोष घोडींदे तसेच अन्य रोटेरियन उपस्थित होते.

**सामाजिक दायित्व :** समाजात वावरताना नेहमीच आपल्या स्वत ःच्या प्रगती बरोबरच आपण समाजाचे सुद्धा काही देणे लागतो, हे आपण कधीही विसरू नये,ही शिकवण मला माझे वडील जे .एम . म्हात्रे यांच्याकडून मिळाली .त्यानुसारच आम्ही संस्थेच्या माध्यमातून कार्य करत असतो . रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या वतीने इर्शाळवाडी दुर्घटनेत जे .एम .म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक कार्याबद्दल आज मला सेवाश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले .त्याबद्दल मी संपूर्ण रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल चे आभार मानतो . हा पुरस्कार मी, माझ्या या कार्यात मोलाचा सहकार्य करणाऱ्या माझ्या सहकाऱ्यांना, संस्थेच्या स्वयंसेवकांना तसेच इतर सर्व संस्था ज्यांनी मदतीचा हात पुढे केला त्यांना समर्पित करतो .
**प्रितम जनार्दन म्हात्रे, मा . विरोधी पक्षनेते पनवेल मनपा**

# वडोद बाजार शिवारातून जनावरांची चोरी

## शेतवस्तीवर असणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज



**रमेश दणके**

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार शिवारात असलेले वडोद बाजार येथील शेतकरी कडूबा रामचंद्र म्हस्के यांचे पिरबावडा रस्त्यावर गट क्रमांक 128 मध्ये शेत असून या ठिकाणी जनावरांचा गोठा असून या गोठ्यात सोमवारी संध्याकाळी त्यांनी दररोज प्रमाणे आपले जनावरे चारापाणी करून बांधली होती मात्र सोमवारच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या जनावराच्या गोठ्यातून तीन गाई एक बैल अशा चार जनावरांची अज्ञात चोरट्यांनी चोरी करून वाहनाद्वारे लंपास केल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली या चोरीच्या घटनेत दोन लाख वीस हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आहे.
मंगळवारी सकाळी ते दूध काढण्यासाठी गोठ्यावर गेले असता जनावरे गोठ्यात आढळून आली नाही या या चोरीच्या घटनेत शेतकऱ्याचे एक पांढरा भुरकट रंगाचा बैल त्याची किंमत चाळीस हजार रुपये एक पांढऱ्या रंगाची जर्सी गाय किंमत पन्नास हजार रुपये एक काळ्या रंगाची दूध देणारी जर्सी गाय किंमत 80 हजार रुपये एक काळ्या रंगाची जर्सी गाय किंमत पन्नास हजार रुपये असा एकूण दोन लाख वीस हजार रुपयांचा किमतीच्या जनावरांची चोरी अज्ञात चोरट्यांनी केली आहे याचोरीच्या घटने प्रकरणी वडोद बाजार पोलिसांना माहिती देऊन तक्रार देण्यात आली आहे वडोद बाजार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली या चोरीच्या घटनेचा तपास वडोद बाजार पोलीस करीत आहे मात्र या जनावरांच्या चोरीच्या घटनेने परिसरातील शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे या चोरीच्या घटनेमुळे शेत वस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्यात आता भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी या चोरीच्या घटनेचा तपास पोलिसांनी लावा वा अशी मागणी आता शेतकऱ्यांकडून होत आहे एकीकडे शेतकऱ्यांना पावसाच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांची पिके हातातून गेले आहे शेतकऱ्यांना मिळणारे उत्पन्न मिळणार नाही त्यात जनावरांना चारा उपलब्ध नसून चाऱ्याची कमतरता भासणार आहे तर आपल्याकडे असलेल्या जनावरांना सांभाळून ठेवण्याची वेळ चोरीच्या भीती मिळाली आहे शेत वस्तीवर राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या चोरीच्या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# नांदा तांडा येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा अमृत महोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा येथील ग्रामपंचायत कार्यालयात नांदा तांडा व परिसरात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन विविध शैक्षणिक संस्था शासकीय निमशासकीय कार्यालय तिरंगा ध्वज फडकून उत्साहात संपन्न झाला या निमित्त शालेय विद्यार्थी प्रभात फेरी, पोवाडे, राष्ट्रभक्तीपर कार्यक्रम झाले याप्रसंगी ग्रामपंचायत पंचायत व सरपंच वरदानसिंग चव्हाण यांनी एक प्रकारचा नवीन आदर्श परिसरात घडविला.

दि.१७//९/२३ रविवार रोजी येथील जेष्ठ अंगणवाडी सेविका शिलाताई पंडीत चव्हाण यांच्या ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहण करण्यात आले गेल्या २० वर्ष पासून जनसेवा करणाऱ्या जेष्ठ महिला अंगणवाडी सेविका शिलाताई चव्हाण ग्रामपंचायत कडून हा मान त्यांना देण्यात आला.यावेळी सरपंच वरदानसिंग चव्हाण, उपसरपंच देवकाबाई राठोड,माजी सरपंच मोरसिंग चव्हाण, कवरसिंग चव्हाण, गणेश चव्हाण, प्रकाश राठोड, देवीदास चव्हाण, रोहिदास राठोड, मोहनदास राठोड, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक वाणीसर, शिक्षकवृंद, गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या वयोवृद्धांचा मुक्तिसंग्रामदिनी ग्रामपंचायतकडून सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाचे औचित्य साधून गावातील पंचाहत्तरी पुर्ण केलेल्या वयवृध्दांचे श्रीफळ पुष्पहार शॉल देवुन ग्रामपंचायत कडून सन्मान करण्यात आला. सरपंच आप्पाराव पाटील नलावडे, उपसरपंच कारभारी नलावडे,पोपट काटकर, जेष्ठ समाजसेवक पुंजाजी अण्णा, भिमराव नलावडे, जमादार नवनाथ कोल्हे,चांद पठाण, शिवाजी काटकर, ज्ञानेश्वर टेलर,भिकन घुले, लक्ष्मण जाधव, सय्यद टेलर,तंमुअ प्रकाश नलावडे, ग्रापंस पुंड,ग्राविअ एबी बनसोड सह मोठ्या संख्येने मान्यवर व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. मराठवाडा, मराठवाडा मुक्ती संग्रामदिन ७५वे सुवर्णमहोत्सव साजरा करत असताना वयवर्ष पंचाहत्तरी पुर्ण केलेल्या वयवृध्दांचे श्रीफळ पुष्पहार शॉल देवुन सत्कार करत सन्मानित करण्यात आले. या उपक्रमाचा सर्वत्र कौतुक अभिनंदन होत आहे. सदर उपक्रम जाहिरपणे मुख्य बाजार पेठ व्यासपीठावर घेण्यात आले.सर्वत्र याची चर्चा सुरु आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# ११ हजार रुद्राक्षांपासून बनली ८ फुटांची भव्य श्री गणेश मूर्ती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** यंदा श्री माहेश्वरी गणेश मंडळाच्या वतीने गणेश उत्सव अतिशय भक्तिभावाने आणि हर्षोउल्हासात साजरा करण्यात येत आहे. विशेष म्हणजे ११ हजार १११ रुद्राक्षांपासून 'श्रीं'ची मूर्ती साकारण्यात आली असून हे रुद्राक्ष परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर, वेरूळचे घृष्णेश्वर मंदिर, औढा नागनाथ येथील मंदिर, नाशिक येथील त्रंबकेश्वर मंदिर, नेपाळ येथील ज्योतिर्लिंग आणि पशुपतीनाथ मंदिर, चिंतामणी मंदिर, हिंगोली येथे विधिवत पूजन करून आणि प. पु. पंडित प्रदीपजी मिश्रा, प.पू.संत अलकाश्रीजी यांच्या हस्ते देखील मंत्रमुग्ध केल्यानंतर 'श्रीं'ची मूर्ती साकारण्यात आली. श्री खडकेश्वर मंदिर प्रांगणावर नेत्रदीपक सजावट करून १५० X १२० आकाराचा डोम उभारण्यात आला आहे. अष्टविनायक दर्शन देखावा साकारण्यात आला आहे. यात आठ मंदिरे निर्माण केली आहेत. आज दि. १९ सप्टेंबर रोजी राज्याचे गृहनिर्माण मंत्री ना. श्री अतुलजी सावे, प्रसिद्ध उद्योजक जुगलकिशोरजी तापडिया, अनिलजी लोया यांच्या हस्ते सपत्नीक 'श्रीं'ची प्रतिष्ठापना करण्यात येणार असल्याचे श्री माहेश्वरी मंडळाचे अध्यक्ष जगदीश बियाणी यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी मंडळाचे सचिव कैलास मुंदडा, प्रकल्प प्रमुख सचिन करवा, शीतल दरक, उत्सव समिती प्रमुख रेखा राठी, ऍड. ओमप्रकाश साबू आदींची उपस्थिती होती.

जगदीश बियाणी म्हणाले कि, श्री माहेश्वरी मंडळाच्या वतीने १५ वर्षांपूर्वी गणेश उत्सव साजरा करण्यात येत होता. जेष्ठ समाजसेवक स्व. जयनारायण बाहेती यांनी याची सुरुवात केली होती. तेव्हा गणेश मंडळाला राज्यस्तरीय पुरस्कारासह आठ विविध पुरस्कार प्राप्त झाले होते. काही कारणाने मध्यंतरी गणेश उत्सव होऊ शकला नाही. मात्र, यंदा पुन्हा श्री माहेश्वरी मंडळाने हि परंपरा सुरु करण्याचा निर्णय घेतला. हि परंपरा पुढेही सुरु ठेवण्याचा मानस आहे. . या गणेश उत्सवात श्री माहेश्वरी मंडळ कार्यकारिणी श्री. माहेश्वरी मंडळाचे अध्यक्ष जगदीश बियाणी, सचिव कैलास मुंदडा, उपाध्यक्ष सचिन करवा, विजय बाहेती, प्रशांत मालानी, ललित बंग, कोषाध्यक्ष सीए अनुज चांडक, सहकोषाध्यक्ष सीए विजयकुमार जाजू, सहसचिव डॉ. स्वरूप लाहोटी, संतोष तोतला, मनोज मर्दा, बाळकृष्ण झंवर, कार्यकारिणी सदस्य भगतसिंग दरक, जगदीश कोठारी, डॉ. दिनेश दरक, अनिल लोया, पराग बाहेती, अरुण मालानी, डॉ. नवल जाजु, डॉ. रामविलास मुंदडा, महेंद्र काबरा, मार्गदर्शक तथा उद्योजक काशिनाथ दरक, माजी अध्यक्ष संतोष लड्डा, सी.एस. सोनी, बालकिशन बलदवा, मनोज तोतला, सर्व प्रभाग यामध्ये गुलमंडी-राजाबाजार प्रभागाचे अध्यक्ष श्रीवल्लभ दरक, सचिव विशाल बजाज, यांच्यासह माहेश्वरी समाज परिवारातील सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत. या गणेश उत्सवात 'श्रीं'च्या दर्शनाचा, अष्टविनायक देखावा पाहून दर्शनाचा सर्व समाजबांधव, भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री माहेश्वरी मंडळाचे अध्यक्ष जगदीश बियाणी, सचिव कैलास मुंदडा, प्रकल्प प्रमुख सचिन करवा, शीतल दरक, उत्सव समिती प्रमुख रेखा राठी, ऍड. ओमप्रकाश साबू, सर्व प्रभाग कार्यकारिणी, सर्व संलग्न संस्था पदाधिकारी- कार्यकारिणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**गणेश भक्तांना विसर्जनानंतर प्रसादरूपी रुद्राक्ष**

श्री माहेश्वरी गणेश उत्सवात साकारण्यात आलेल्या रुद्राक्ष गणेश मूर्तीमध्ये प्रत्येकाचा सहभाग असावा यासाठी गणेश विसर्जनानंतर भाविकांना रुद्राक्ष, श्रीफळ आणि प्रसाद उपलब्ध करून देण्यात येणार आहे . यासाठी देणगीमूल्य २५१ रुपये ठेवण्यात आले आहे . भाविकांनी रुद्राक्षरूपी प्रसाद घेण्यासाठी गणेश मंडळाच्या सभामंडपच्या ठिकाणी असलेल्या कार्यालयात नोंदणी करावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे .

**शालेय विद्यार्थ्यांना देखावा पाहण्याची संधी**

अतिशय मनमोहक अशी रुद्राक्षांपासून 'श्रीं'ची मूर्ती हिंगोली येथील मूर्तिकार मंगेश भूसांडे यांनी साकारली आहे . ८ फुटांची 'श्रीं'ची मूर्ती, अष्टविनायक देखावा आणि सुंदर अशी सजावट पाहण्यासाठी गणेश उत्सवाच्या नंतर देखील दोन दिवस संधी मिळणार आहे . हा देखावा शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना पाहता यावा यासाठी बंसल क्लासेस महाराष्ट्र यांच्यावतीने व्यवस्था करण्यात आली आहे . यासोबतच सामान्य ज्ञान, रांगोळी आणि चित्रकला स्पर्धा देखील आयोजित करण्यात येणार आहेत .



# घोटाळ्याची चौकशी न झाल्यास आमरण उपोषण : कासम मुलाणी

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** तळोजा विभागातील फेज १ व फेज २ मधील २८ कोटी रुपये खर्च करून रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले. परंतु या रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली.हा रस्ता पहिल्या पावसातच वाहून गेला.या रस्त्याच्या कामाची सखोल चौकशी होऊन सिडको अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येऊन संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी आग्रही मागणी पाचनंद नगर रहिवासी सामाजिक संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष कासम मुलाणी यांनी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अतिशय निकृष्ट पद्धतीने या रस्त्याचे डांबरीकरण झालेले असल्याने दोन महिन्यातच २८ कोटी रुपये खड्डयात गेल्याचे उघड झाले आहे.त्यासंदर्भात दि. २५ ऑगस्ट रोजी २८ कोटी रुपयांच्या महाघोटाळ्याची चौकशी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

परंतु अद्याप सिडको प्रशासन चौकशी संदर्भात ढीम्म आहे. त्यामुळे दिनांक ११ सप्टेंबर रोजी पुन्हा सिडको प्रशासनाला स्मरणपत्र देण्यात आले.पुढील सात दिवसांमध्ये ठेकेदार व भ्रष्ट अधिकारी यांची सखोल चौकशी करण्यात यावी,अन्यथा नाईलाजस्तव नागरिकांच्या न्याय हक्कांसाठी पाचनंद नगर रहिवासी सामाजिक संस्थेच्या नेतृत्वात दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून आमरण उपोषण केले जाईल असा इशारा कासम मुलाणी यांनी सिडकोला दिला आहे.यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सिडको कार्यकारी अभियंता मिलिंद माने व त्यांचे संबंधित सहकारी सर्वस्वी जबाबदार राहतील.

**२८ कोटी रुपये खड्डयात** : तळोजा फेज १, २ विभागातील २८ कोटी रुपये खर्चून बनविण्यात आलेल्या रस्त्यांची अक्षरश : दुर्दशा झालेली आहे .या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाहीन पद्धतीने केलेले असल्याने या कामात महागोटाळा झालेला असून सिडको अधिकारी संबंधित ठेकेदारास पाठीशी घालत आहेत .त्यामुळे २ महिन्यांतच जनतेचे २८ कोटी रुपये खड्डयांत गेल्याचे उघड झाले असून या महाघोटाळ्याची सखोल चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा सिडकोला दिला आहे .

**कासम मुलाणी, संस्थापक अध्यक्ष : पाचनंद नगर रहिवासी सामाजिक संस्था**

# अकोला जिल्ह्यात गुटख्याची अवैध साठवणूक

आधुनिक केसरी न्यूज



**अकोला :** जिल्ह्यात गुटख्याची अवैधरित्या साठवणूक केली जात आहे. तेल्हारा येथे गोपाल टॉकीज मागे एका घरात मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा असल्याच्या माहितीवरून अकोट पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत १२ लाख रुपयांचा गुटख्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. तेल्हारा येथील रहिवासी रवि हरिचंद फुलवंदे व २९ वर्ष यांच्या राहत्या घरात मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा असल्याची माहिती अकोट उपविभागीय पोलीस अधिकारी रितू खोकर यांना मिळाली. या माहितीवरून त्यांनी पाळत ठेवून फुलवंदे यांच्या घरात छापा टाकला. त्यानंतर त्याच्या घरातून प्रतिबंधित असलेला विविध कंपनीचा सुमारे १२ लाख रुपयांचा गुटख्याचा साठा जप्त केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदिप घुगे, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली रितू खोकर, सचिन जाधव, गजानन इंगळे, कादीर गवळी, संतोष मेहंगे, शेख सलमान, अभिजीत पांडे, गौरव डाबेराव यांनी केली.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर